**आरबीआय/२००९-१०/६९**

**डीबीओडी क्र. डीआयआर.बीसी १३/१३.०३.००/२००९-१०**

**जुलै १, २००९**
**आषाढ १, १९३१ (शक)**

**सर्व अनुसूचित वाणिज्य बँका**
**आरआरबी सोडून**
**महोदय,**

**महापरिपत्रक -कर्जे व अग्रिम राशी वैधानिक व अन्य निर्बंध**

कृपया आमचे महापरिपत्रक डीबीओडी क्र. डीआयआर.बीसी १७/१३.०३.००/२००८-०९ दि. जुलै १, २००८ चा संदर्भ घ्यावा. त्यात आम्ही, कर्जे व अग्रिम राशींवरील बँकांनी दिलेली, वैधानिक व अन्य निर्बंधांसंबंधीची मार्गदर्शक तत्वे/निदेश एकत्रित केले होते. हे महापरिपत्रक, जून ३०, २००९ पर्यंत दिलेल्या सूचना त्यात समाविष्ट करुन अद्यावत करण्यात आले असून ते आरबीआयच्या वेबसाईटवरही (http://www.rbi.org.in) टाकण्यात आले आहे. ह्या महापरिपत्रकाची एक प्रत सोबत जोडण्यात आली आहे.

आपला

**(पी. विजय भास्कर)**

**प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक,**

सोबतः वरील प्रमाणे

**अनुक्रमणिका**


| परिच्छेद | विषय | पृ |
|---|---|---|
| अ | उद्देश | ३ |
| ब | वर्गीकरण | ३ |
| क | पूर्वीच्या सूचना | ३ |
| ड | उपयोग | ३ |
| १ | प्रस्तावना | ५ |
| २ | मार्गदर्शक तत्वे | ५ |
| २.१ | वैधानिक निर्बंध | ५ |
| २.१.१ | बँकेच्या स्वतःच्या शेअर्सविरुध्द अग्रिम राशी | ५ |
| २.१.२ | बँकेच्या संचालकांना अग्रिम राशी देणे | ५ |
| २.१.३ | कंपन्यांमधील शेअर्स-धारणाबाबत निर्बंध | ७ |
| २.१.४ | त्यांच्या प्रतिभूतींची पुनर्खरेदी करण्यासाठी कंपन्यांना द्यावयाच्या कर्जावरील निर्बंध | ८ |
| २.२ | विनियामक निर्बंध | ८ |
| २.२.१ | संचालकांच्या नातेवाईकांना कर्जे व अग्रिमराशी देणे | ८ |
| २.२.२ | बँकेच्या अधिकाऱ्यांना व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नातेवाईकांना कर्जे व अग्रिम राशी देण्याबाबतचे निर्बंध | ११ |
| २.२.३ | ओझोन कमी करणारे पदार्थ (ओडीएस) तयार करण्याऱ्या/वापरणाऱ्या उद्योगांना अर्थसहा करण्यावरील निर्बंध | १३ |
| २.२.४ | सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोल (एससीसी) खाली संवेदनशील मालाविरुध्द अग्रिम राशी देण्याबाबत निर्बंध | १४ |
| २.२.५ | अधिकाऱ्यांसह, कर्मचारीवर्गाच्या सभासदांना कमिशन देण्याबाबत निर्बंध | १७ |
| २.३ | इतर कर्जे व अग्रिम राशींवरील निर्बंध | १७ |
| २.३.१ | शेअर्स, डिबेंचर्स व बॉंड्सविरुध्द कर्जे व अग्रिम राशी | १७ |
| २.३.२ | मनीमार्केट म्युच्युअल फंड्स | १७ |
| २.३.३ | इतर बँकांनी दिलेल्या स्थिर ठेवींच्या पावत्यांविरुध्द (एफडीआर) अग्रिम राशी | १७ |
| २.३.४ | ठेवी-चालनाच्या आधारवर एजंट/मध्यस्थ ह्यांना अग्रिम राशी देणे. | १८ |
| २.३.५ | ठेवींच्या प्रमाणपत्रांविरुध्द (सीडी) कर्जे | १८ |
| २.३.६ | अबँकीय वित्त कंपन्यांना (एनबीएफसी) बँकेकडून अर्थसहाय्य | १८ |
| २.३.७ | पायाभूत/गृहनिर्माण प्रकल्पांना वित्तपुरवठा | १८ |
| २.३.८ | वित्तीय संस्थाच्या नावे बँक हमी देणे | २४ |
| २.३.९. | बँकांद्वारे बिलांचे डिस्काउंटिंग/रिडिस्काउंटिंग | २५ |
| २.३.१० | बुलियन/प्रायमरी सोने ह्याविरुध्द अग्रिम राशी | २७ |
| २.३.११ | सोन्याचे दागिने व जडजवाहीरांविरुध्द अग्रिम राशी | २८ |
| २.३.१२ | सोने (धातु) कर्ज | २८ |
| २.३.१३ | रियल ईस्टेट क्षेत्राला कर्जे व अग्रिम राशी | ३० |
| २.३.१४ | लघु उद्योगांना क्षेत्राला कर्जे व अग्रिम राशी | ३० |
| २.३.१५ | बँक क्रेडिटच्या डिलीव्हरीसाठी कर्ज प्रणाली | ३० |
| २.३.१६ | बँका एकत्रित येऊन (कन्सोर्टियम)/बहुविध बँकीय व्यवस्थेखाली कर्ज देणे | ३१ |
| २.३.१७ | माहिती तंत्रज्ञान व सॉफ्टवेअर उद्योगांना कार्यकारी भांडवल वित्तपुरवठा | ३१ |

| | | |
|---|---|---|
| २.३.१८ | भारत सरकरच्या पीएसयु निर्गुंतवणुकीसाठी बँकांद्वारे वित्तपुरवठा करण्याबाबत मार्गदर्शक | ३२ |
| २.३.१९ | किसान विकासपत्रे (केव्हीपी) मिळविण्यासाठी कर्जे देणे | ३४ |
| २.३.२० | ७ % बचत बाँड्स, २००२; ६.५% बचत बाँड्स २००३ (अ-करपात्र) आणि ८% बचत (करपत्र) बाँड्स, २००३ - गहाणवट सुविधा | ३५ |
| २.३.२१ | अकार्यकारी ॲसेट्सच्या तडजोडीवरील मार्गदर्शक तत्वे-कोर्टाकडून कन्सेंट डिक्री मिळविणे | ३५ |
| २.३.२२ | बँकांचा प्रोजेक्ट फायनान्स पोर्टफोलिओ | ३५ |
| २.३.२३ | सरकारकडून येणे असलेल्या रकमांबाबत सेतु कर्जे (ब्रिज लिन्स) | ३६ |
| २.४ | धनकोंसाठी उचित व्यवहार संहितेवरील मार्गदर्शक तत्वे | ३६ |
| जोडपत्र १ | नियंत्रित पदार्थांची यादी | ४० |
| जोडपत्र २ | नियंत्रित पदार्थांची यादी | ४१ |
| जोडपत्र ३ | सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोल - इतर कार्यकारी अटी | ४३ |
| जोडपत्र ४ | सोने आयात करण्यासाठी नेमलेल्या बँकांची यादी | ४५ |
| जोडपत्र ५ | एकत्रित केलेल्या परिपत्रकांची यादी | ४७ |


## कर्जे व अग्रिम राशीवरील महापरिपत्रक वैधानिक व इतर निर्बंध

**अ) उद्देश**

हे महापरिपत्रक, रिझर्व बँकेने, बँकांना, कर्जे व अग्रिम राशींवरील वैधानिक व इतर निर्बंध ह्याबाबत दिलेल्या सूचना एकत्रित करते.

**ब) वर्गीकरण**

बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ अन्वये दिलेल्या अधिकारांचा वापर करुन रिझर्व बँकेने दिलेले वैधानिक मार्गदर्शक तत्व.

**क) आधीच्या सूचना**

जोडपत्र ५ मध्ये दिलेल्या परिपत्रकांमधील वरील विषयावरील सूचना ह्या महापरिपत्रकात एकत्रित व अद्यावत करण्यात आल्या आहेत.

**ड) उपयोग**

प्रादेशिक ग्रामीण बँका सोडून सर्व अनुसूचित वाणिज्य बँकांना

**रचना**

**१) प्रस्तावना**

**२) मार्गदर्शक तत्वे**

२.१ वैधानिक नियंत्रणे
२.२ विनियामक नियंत्रणे
२.३ इतर कर्जे व अग्रिम राशींवरील नियंत्रणे
२.४ धनकोंसाठी उचित व्यवहार संहितेवरील मार्गदर्शक तत्वे.

**३) जोडपत्र**

जोडपत्र १ नियंत्रित पदार्थांची यादी
जोडपत्र २ नियंत्रित पदार्थांची यादी
जोडपत्र ३ सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोल - इतर कार्यकारी अटी
जोडपत्र ४ सोने आयात करण्यासाठी नेमलेल्या बँकांची यादी
जोडपत्र ५ एकत्रित केलेल्या परिपत्रकांची यादी

**प्रस्तावना**

महापरिपत्रक, अनुसूचित वाणिज्य बँकांना, दिलेल्या कर्जे व अग्रिम राशींवरील वैधानिक व इतर निर्बंधांबाबत नियम/विनियम/सूचनांची एक संरचना उपलब्ध करुन देते.

**२. मार्गदर्शक तत्वे**

**२.१ वैधानिक निर्बंध**

**२.१.१ बँकेच्या स्वतःच्या शेअर्सविरुध्द अग्रिम राशी**
बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या कलम २०(१) अनुसार, एखादी बँक तिच्या स्वतःच्या शेअर्सविरुध्द कोणतीही कर्जे व अग्रिम राशी देऊ शकत नाही.

**२.१.२ बँकेच्या संचालकांना अग्रिम राशी**
२.१.२.१ बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या कलम २० (१) मध्ये, ज्यांचा बराचसा हिस्सा/भाग आहे अशा कंपन्यांच्या संचालकांना कर्जे व अग्रिम राशी देण्याबाबत असलेले निर्बंध देण्यात आले आहेत.

२.१.२.२ बँकांना पुढील बाबतीत कर्जे किंवा अग्रिम राशी देण्यास किंवा आश्वासन देण्याबाबत मनाई करण्यात आली आहे - त्यांचे संचालक किंवा त्यांच्या वतीने किंवा अशी कोणतीही संस्था/कंपनी ज्यात बँकेच्या संचालकांपैकी कोणीही भागीदार, व्यवस्थापक, कर्मचारी किंवा हमीदार म्हणून आहे, किंवा अशी कोणतीही कंपनी (त्या बँकिंग कंपनीची दुय्यम संस्था किंवा कंपनीज अधिनियम, १९५६ च्या कलम २५ खाली पंजीकृत कंपनी किंवा सरकारी कंपनी नसलेली) किंवा अन्य कोणतीही कंपनी किंवा जिची दुय्यम किंवा धारक कंपनी ह्यात त्या बँकेचे संचालक, संचालक, मॅनेजिंग एजंट, व्यवस्थापक, कर्मचारी किंवा हमीदाता आहेत किंवा त्या संचालकांचा बराचसा भाग आहे किंवा अशी एखादी व्यक्ती की जिच्या बाबतीत ते संचालक भागीदार किंवा हमीदाता आहेत.

२.१.२.३ ह्याबाबतीत काही अपवादही आहेत. ह्या कलमाच्या स्पष्टीकरणानुसार "कर्जे व अग्रिम राशी" ह्यामध्ये, ह्या कलमासाठी, रिझर्व बँकेने सर्वसाधारण किंवा खास आदेश काढून, कर्ज किंवा अग्रिम राशी नाही असे विहित केलेला व्यवहार समाविष्ट नाही. असे करीत असताना, रिझर्व बँक त्या व्यवहाराचे स्वरुप, तो करण्यात आल्याचा कालावधी व तो कोणत्या प्रकारे व कोणत्या परिस्थितीत करण्यात आला, त्या व्यवहारामुळे येणे असलेली रक्कम वसूल होईल काय, ठेवीदारांचा त्यातील हेतू व इतर संबंधित बाबी विचारात घेईल.

२.१.२.४ ह्या कलमासाठी, एखादा व्यवहार हा कर्ज आहे की अग्रिम राशी असा प्रश्न उभा राहिल्यास तो आरबीआयकडे पाठविण्यात येईल व त्याबाबत आरबीआयचा निर्णय अंतिम समजला जाईल.

२.१.२.५ वरील उद्देशासाठी "कर्जे व अग्रिम राशी" ह्या संज्ञेमध्ये पुढील गोष्टींचा समावेश असेल-

(अ) सरकारी प्रतिभूती, विमा पॉलिसी, किंवा स्थिर ठेवींविरुध्द कर्जे किंवा अग्रिम राशी.

(ब) ॲग्रिकल्चरल फायनान्स कॉर्पोरेशन लि. ह्यांना दिलेली कर्जे किंवा अग्रिम राशी.

(क) एखाद्या बँकिंग कंपनीने तिच्या कोणत्याही संचालकाला (जो संचालक होण्याच्या अगदी आधी त्या बँकिंग कंपनीचा कर्मचारी होता) त्या बँकिंग कंपनीचा एक कर्मचारी ह्या क्षमतेत दिलेली व तो त्या बँकिंग कंपनीचा संचालक झाला नसता तर त्याला कर्मचारी म्हणून लागु होत असणाऱ्या अटी व शर्तींवर दिलेली कर्जे किंवा अग्रिम राशी. अशा बँकिंग कंपनीमध्ये बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या कलम २० च्या तरतुद जिला लागु आहेत अशा प्रत्येक बँकेचा समावेश होतो.

(ड) त्या बकिंग कंपनीने, तिचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला, (त्याची अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नेमणुक होण्याच्या अगदी आधी त्या कंपनीचा कर्मचारी नव्हता) कार, पर्सनल कॉम्प्युटार, फर्निचर विकत घेण्यासाठी किंवा त्याच्या स्वतःच्या वापरासाठी घर बांधण्यासाठी/मिळविण्यासाठी व सणानिमित्त अग्रिम राशी ह्यासाठी दिलेली व आरबीआयच्या पूर्वपरवानगीने व तिने घातलेल्या अटी व शर्तीने दिलेली कर्जे किंवा अग्रिम राशी.

(ई) एखाद्या बँकिंग कंपनीने तिच्या पूर्णवेळ संचालकाला, फर्निचर, कार, पर्सनल कॉम्प्युटर विकत घेण्यासाठी किंवा त्याच्या स्वतःच्या उपयोगासाठी घर बांधण्यास/मिळविण्यास आणि आरबीआयच्या पूर्वपरवानगीने व तिने घातलेल्या अटी व शर्तींवर दिलेली कर्जे व सणानिमित्ते अग्रिम राशी.

(ग) पुढील प्रकारच्या सुविधा - खरेदी केलेली/ डिस्काउंट केलेली बिले (कागदोपत्री, किंवा क्लीन व साईट किंवा युजन्स आणि डी/ए किंवा डी/पी धर्तीवरील), चेक्स विकत घेणे, बिलांचा स्वीकार/सहस्वीकार, ह्यासारख्या निधीवर आधारित नसलेल्या सुविधा, एल/सी उघडणे, हमी देणे, तृतीय पक्षाकडून डिबेंचर्स विकत घेणे इत्यादि.

(ह) तडजोड (सेटलमेंट) सुरळीतपणे व्हावी ह्यासाठी, सेटलमेंट बँकर्सनी, नॅशनल सिक्युरिटी क्लियरिंग कॉर्पोरेशन लि (एनएससीसीएल)/क्लियरिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि (सीसीआयएल) ह्यांना दिलेली लाईन ऑफ क्रेडिट/ओव्हरड्राफ्ट सुविधा

(आय) एखाद्या बँकेने तिच्या संचालकांना उपलब्ध करुन दिलेल्या क्रेडिट कार्ड सुविधेखाली मंजुर केलेली क्रेडिट मर्यादा. मात्र अशी मंजुर केलेली मर्यादा, त्या बँकेने क्रेडिट कार्ड व्यवहारातील नेहमीचेच निकष लावून ठरविली असली पाहिजे.

सूचनाः- वरील खंड (ड) व (ई) मध्ये निर्देश केल्याप्रमाणे रिझर्व बँकेची पूर्वमंजुरी मिळविण्यासाठी त्या बँकेने, डिपार्टमेंट ऑफ बँकिंग ऑपरेशन्स अँड डेवलपमेंट, केंद्रीय कार्यालय, मुंबई ह्यांचेकडे अर्ज करावा.

२.१.२.६ संचालक व त्याच्या संस्था ह्यांच्याकडील बिलांची खरेदी किंवा डिस्काउंटिंग, (ज्यांचे स्वरुप स्वच्छपणे सामाऊन घेणे आहे (अकोमोडेशन) ह्यांना बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या कलम २० साठी “कर्जे व अग्रिम राशी” असे समजले जाते.

२.१.२.७ बँकेच्या संचालकांच्या वतीने हमी देणे व एल/सी उघडणे ह्याबाबत, येथे नोंद केली जावी की, मुख्य ऋणकोने त्याचे दायित्व पूर्ण करण्यात कसुरी केल्याने, त्या बँकेला, हमी किंवा एल/सीखाली तिची जबाबदारी पूर्ण करण्यास पाचारण केले गेल्यास, बँक व तो संचालक ह्यांच्यामधील सबंध धनको व ऋणकोचे होऊ शकतात. ह्याशिवाय, हे ही शक्य आहे की कलम २० च्या तरतुदी टाळण्यासाठी तो संचालक, बँकेने दिलेल्या हमी विरुध्द तृतीय पक्षाकडून कर्ज घेऊ शकतो. अशा दायित्वांखाली असलेल्या जबाबदाऱ्या त्यांच्यावरच येणार नाहीत ह्याची खात्री करुन घेण्यासाठी बँकेने योग्य पाउले न उचलल्यास, अशा प्रकारच्या व्यवहारांमुळे कलम २० खाली घातलेल्या निर्बंधाचे अस्तीत्व धोक्यात येते.

२.१.२.८ वरील बाबींचा विचार करता, हमी, एल/सी, संचालकांच्या आणि त्या संचालकांचा भाग असलेल्या कंपन्या/संस्था ह्यांच्या वतीने स्वीकार देणे अशा निधी आधारित नसलेल्या कार्यकृतींबाबत खात्री करुन घेण्यात यावी की,-

(अ) एल/सी उघडणारे किंवा स्वीकार करणारे किंवा हमी देणारे ह्यांच्याकडून त्यांनी दिलेली आश्वासने त्यांच्याच स्वतःच्या स्त्रोतांमधून पूर्ण केली जातील ह्याबाबतच्या सुयोग्य व परिणामकारक व्यवस्था बँकेचे समाधान होईल अशा प्रकारे केल्या गेल्या आहेत.

(ब) एखादी हमी आवाहित केली जाण्यावर संबंधित जबाबदारी/दायित्व पूर्ण करण्यास कोणतेही कर्ज किंवा अग्रिम राशी देण्यास बँकेला आवाहन केले जाणार नाही.

(क) एल/सी किंवा स्वीकार ह्यामुळे बँकेवर कोणतीही जबाबदारी पडणार नाही.

२.१.२.९ वरील (ब) किंवा (क) मधील आणीबाणी उद्‌भवल्यास ती बँक, बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या कलम २० चे उल्लंघन करणारा एक पक्ष असे समजल्यात येईल.

२.१.२.१० <u>कर्जाचे पैसे पाठविण्याच्या अधिकारावरील निर्बंध</u>

बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या कलम २० अ मधील अटीनुसार, कंपनीज् अधिनियम १९५६ च्या कलम २९३ मध्ये काहीही दिले असले तरी, एखादी बँकिंग कंपनी, रिझर्व बँकेची पूर्वमंजुरी घेतल्याशिवाय, पुढील बाबतीत असलेले कर्ज संपूर्णतः किंवा त्याचा भाग ह्याचे पैसे पाठवू शकणार नाहीः-

(अ) तिच्या संचालकांपैकी कोणाचेही किंवा

(ब) कोणत्याही संस्थे किंवा कंपनीचे, जिच्यामध्ये, तिच्या संचालकांपैकी कोणाचाही, संचालक, भागीदार, मॅनेजिंग एजंट किंवा हमीदार म्हणून हितसंबंध आहेत, किंवा

(क) कोणत्याही व्यक्तीचे, जर त्या कंपनीचे कोणतेही संचालक ह्या व्यक्तीचा भागीदार किंवा हमीदार असल्यास.
वर दिलेल्या तरतुदींचा विपर्यास केल्यास मागितलेल्या माफीचा काहीही परिणाम होणार नाही.

**२.१.३ कंपन्यांमधील शेअर्स धारण करण्यावरील निर्बंध**

२.१.३.१ बँकिंग रेग्युलेशन अधिनियम,१९४९ च्या कलम १९ (२) अनुसार, बँकांनी, उपकलम (१) नुसार सोडल्यास, कोणत्याही कंपनीत, प्लेजी, मॉर्गेजी किंवा संपूर्ण मालक ह्या नात्याने, त्या कंपनीच्या भरणा-भांडवलाच्या ३० टक्कयांपेक्षा किंवा त्या बँकेच्या भांडवल व राखीव निधीच्या ३० टक्कयांपेक्षा (ह्यापैकी जे कमी असेल ते) अधिक रकमेचे शेअर्स धारण करु नये.

२.१.३.२ ह्याशिवाय, बँकिंग रेग्युलेशन अधिनियम १९४९ च्या कलम(३) अन्यवे, त्या बँकेने, तिचा व्यवस्थापकीय संचालक किंवा मॅनेजर ज्या कंपनीत कोणत्याही रितीने संबंधित किंवा हितसंबंध असलेला आहे अशा कंपनीत, प्लेज, मॉर्गेजी किंवा संपूर्ण मालक म्हणून शेअर्स धारण करु नये.

२.१.३.४ त्यानुसार, शेअर्सविरुध्द कर्जे व अग्रिम राशी देताना, कलम १९ (२) व १९ (३) मधील वैधानिक तरतदींचे काटेकोरपणे पालन केले जावे.

## २.१.४ सिक्युरिटीजच्या पुनर्खरेदीसाठी (बायबँक)कंपन्यांना द्यावयाच्या कर्जांवरील निर्बंध

कंपनीज् अधिनियम, १९५६ च्या कलम ७७ अ (१) अनुसार, कंपन्यांना पुढील प्रकारे त्यांचे स्वतःचे शेअर्स किंवा अन्य विशिष्ट सिक्युरिटीज् खरेदी करण्यास परवानगी आहे -

- मुक्त राखीव निधी, किंवा
- सिक्युरिटीज प्रिमियम अकाउंट, किंवा
- कोणतेही शेअर्स किंवा अन्य विशिष्ट सिक्युरिटीजचे उत्पन्न

मात्र ह्यासाठी, कंपनीज् (सुधारणा) अधिनियम, १९९९ मध्ये विहित केलेल्या निरनिराळ्या अटींचे पालन केले असले पाहिजे. ह्यासाठी, बँकांनी कंपन्यांना शेअर्स/सिक्युरिटीजची पुनर्खरेदी करण्यासाठी कर्जे देऊ नयेत.

## २.२ वैधानिक निर्बंध

### २.२.१ संचालकांच्या नातेवाईकांना कर्जे व अग्रिम राशी देणे.

सचालक मंडळाच्या मंजुरी शिवाय किंवा माहितीशिवाय, बँकेचे अध्यक्ष/व्यवस्थापकीय संचालक किंवा अन्य संचालक, ह्यांचे नातेवाईक इतर बँकांचे संचालक (अध्यक्ष/व्यवस्थापकीय संचालक ह्यासह) व त्यांचे नातेवाईक, अनुसूचित सहकारी बँकाचे संचालक व त्यांचे नातेवाईक, वित्तपुरवठा करणाऱ्या बँकांनी किंवा इतर बँकांनी स्थापन केलेल्या दुय्यम कंपन्यांच्या/संचालकांना/म्युच्युअल फंडांच्या/व्हेंचर कॅपिटल फंडांच्या ट्रस्टींना खाली दिल्याप्रमाणे कर्जे व अग्रिम राशी देऊ नयेत.

२.२.१.१ <u>अन्योन्य (रेसिप्रोकल) धर्तीवर संचालक व त्यांचे नातेवाईक ह्यांना कर्ज देणे.</u>
असे काही प्रसंग घडले आहेत की जेथे बँकांनी एकमेकींचे संचालक, त्यांचे नातेवाईक ह्यांना कर्जसुविधा देण्यासाठी, आपापसातच अनौपचारीक समझोता किंवा परस्पर/अन्योन्य व्यवस्था केली आहे. पुढे पुढे तर त्यांनी त्यांच्या कर्जदारांना, विशेषतः विशिष्ट गटामधील संचालक, त्यांचे नातेवाईक ह्यांना कर्जमर्यादा मंजुर करण्याबाबतची कार्यरीत व मानके ह्यांचेही पालन केले नाही. पक्षांच्या वैय्याक्तिक खात्यांच्या कार्यकारितेमध्ये, मंजुरीप्राप्त मर्यादा व सवलतींपेक्षा खूपच जास्त मर्यादा व सवलती दिल्या गेल्या होत्या. इतर बँकांचे संचालक व त्यांचे नातेवाईक ह्यांना कर्ज सुविधा देण्यासंबंधी बँकेवर कोणतेही कायदेशीर मनाई नसली तरी, संसदेमध्ये ह्याबाबत गंभीर दखल घेतली गेली, कारण अशा “जशास तसे” व्यवस्था नैतिक समस्या समजल्या जात

नाही. ह्यासाठी बँकांनी, संचालकांच्या नातेवाईकांना कर्जे व अग्रिम राशी देताना, तसेच इतर बँकांचे संचालक व त्यांचे नातेवाईक ह्यांना कंत्राटे देताना, खाली दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे अनुसरण करावेः-

२.२.१.२ संचालक मंडळ/व्यवस्थापन समितीने मंजुरी दिल्याशिवाय बँकांनी एकूण रु २५ लाख व त्यापेक्षा अधिक रकमेची कर्जे व अग्रिम राशी पुढील व्यक्तींना देऊ नयेतः

(अ) इतर बँकांचे संचालक (व्यवस्थापकीय संचालक/अध्यक्ष ह्यासह) *

(ब) इतर बँकाचे संचालक* ज्यात भागीदार किंवा हमीदार आहेत अशी कोणतीही कंपनी.

(क) इतर बँकांमधील कोणताही संचालक* ज्यात त्याचा बराचसा हितसंबंध असलेले किंवा संचालक किंवा हमीदाता आहे अशी कोणतीही कंपनी

२.२.१.३ संचालक मंडळ/व्यवस्थापन समितीने मंजुरी दिल्याशिवाय बँकांनी एकूण रु २५ लाख व त्यावरील रकमेची कर्जे व अग्रिम राशी पुढील व्यक्तींना देऊ नयेतः

(अ) त्यांचे स्वतःचे अध्यक्ष/व्यवस्थापकीय संचालक किंवा अन्य संचालक ह्यांचे कोणतेही नातेवाईक;

(ब) इतर बँकांचे* अध्यक्ष/व्यवस्थापकीय संचालक किंवा इतर संचालक ह्यांचे कोणतेही नातेवाईक;

(क) वरील (अ) व (ब) मध्ये निर्देश केलेले नातेवाईक ज्यात भागीदार किंवा हमीदाता आहेत अशी कोणतीही कंपनी; आणि

(ड) वरील (अ) व (ब) मध्ये निर्देश केलेले नातेवाईक ज्यात बराचसा हितसंबंध असलेले किंवा संचालक किंवा हमीदाता आहेत अशी कंपनी.

* अनुसूचित सहकारी बँकांचे संचालक, दुय्यम कंपन्यांचे संचालक/म्युच्युअल फंडांचे/व्हेंचर कॅपिटल फंडाचे ट्रस्टी ह्यासह.

२.२.१.४ ह्या कर्जदारांचे, रु २५ लाखांपेक्षा कमी रकमेचे कर्जसुविधेचे वित्तपुरवठा करणाऱ्या त्या बँकेच्या सुयोग्य  व तसा अधिकार मिळालेल्या प्राधिकरणाद्वारे मंजुर केले जावेत. तथापि अशी बाब संचालक मंडळाला कळविली जावी.

२.२.१.५ अशा प्रकारच्या प्रस्तावावर चर्चा केली जात असताना, त्या प्रस्तावामध्ये प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष हितसंबंध असलेले अध्यक्ष/व्यवस्थापकीय संचालक किंवा अन्य संचालकांनी, संचालक मंडळाला, त्याचा त्या प्रस्तावात कशा प्रकारचा हितसंबंध आहे ते सांगावे. माहिती मिळविण्यासाठी अन्य संचालकांनी त्याची हजेरी आवश्यक असल्याचे सांगितल्याशिवाय त्या संचालकाने त्या सभेस हजर राहू नये आणि अशा हजर राहणे आवश्यक असलेला संचालक अशा प्रस्तावावर आपले मत देणार नाही.

२.२.१.६ कर्जे व अग्रिम राशी देण्याबाबतचे वरील निकष कंत्राटे देण्याबाबतही समानतेने लागु होतील.

२.२.१.७ “ नातेवाईक” ह्या संज्ञेची व्याप्ती खालीप्रमाणे असेल.

- पति /पत्नी
- वडील
- आई (सावत्र आईसह)

- मुलगा (सावत्र मुलासह)
- मुलाची पत्नी
- मुलगी (सावत्र मुलीसह)
- मुलीचा पति
- भाऊ (सावत्र भावासह)
- भावाची पत्नी
- बहीण (सावत्र बहिणीसह)
- बहिणीचा पति
- पति/पत्नीचा भाऊ (सावत्र भावासह)
- पति/पत्नीची बहीण (सावत्र बहिणीसह)

२.२.१.८ "कर्जे व अग्रिम राशी" ह्या संज्ञेत बाबींविरुध्द दिलेल्या कर्जांचा व अग्रिम राशींचा समावेश असणार नाहीः-

- सरकारी प्रतिभूती
- जीवन विमा पॉलिसीज्
- स्थिर किंवा अन्य ठेवी
- स्टॉक्स व शेअर्स
- छोट्या रकमेचे, म्हणजे रु २५०००/- पर्यंतचे तात्पुरते ओव्हरड्राफ्ट्स
- एका वेळी रु ५०००/- पर्यंत केलेली चेक्सची अनौपचारिक खरेदी
- कर्मचाऱ्यांना सर्वसाधारणतः लागु असलेल्या कोणत्याही योजनेखाली बँकेच्या कोणत्याही कर्मचाऱ्याला दिलेली गृहकर्ज, कार ॲडव्हान्स इत्यादि.

२.२.१.९ "बराचसा भाग" (सबस्टॉंशियल इंटरेस्ट) ह्या संज्ञेचा अर्थ, बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या कलम ५ (एनई) मध्ये त्या संज्ञेला दिल्यानुसारच असेल.

२.२.१.१० वित्तपुरवठा करणाऱ्या बँकांसमोर ठेवलेले कर्ज प्रस्ताव/कंत्राटे ह्यामध्ये, त्या बँकेच्या किंवा दुसऱ्या बँकेच्या संचालकाचे किंवा त्याच्या नातेवाईकांचे हितसंबंध/रस जाणून घेण्यासाठी, बँकांनी इतर गोष्टींबरोबर पुढील कार्यरीत तयार करावी -

१) प्रत्येक कर्जदाराने बँकेला पुढील प्रमाणे घोषणापत्र द्यावे की,

अ) तो (जेथे कर्जदार ही एक व्यक्ती आहे तेथे) एखाद्या बँकिंग कंपनीचा संचालक किंवा संचालकाचा विहित केलेला नातेवाईक नाही.

ब) (जेथे कर्जदार ही एक भागीदार कंपनी आहे तेथे) संचालकांपैकी कोणीही, एखाद्या बँकिंग कंपनीचा संचालक किंवा संचालकाचा विहित केलेला नातेवाईक नाही.

क) (जेथे कर्जदार ही एक संयुक्त स्टॉक कंपनी आहे तेथे) संचालकापैकी कोणीही, एखाद्या बँकिंग कंपनीचा संचालक किंवा संचालकाचा विहित केलेला नातेवाईक नाही.

२) ह्या घोषणापत्रात, त्या कर्जदाराचे, बँकेच्या संचालकाशी असलेले नातेही देण्यात यावे.

२.२.१.११ - ह्या सूचनांचे अनुपालन केले गेल्याची खात्री करुन घेण्यासाठी, कर्जदाराने खोटी माहिती दिल्याचे आढळून आल्यास, बँकांनी त्या कर्जाची ताबडतोब परतफेड करण्यास सांगावे

२.२.१.१२ अनुसूचित सहकार बँकांच्या संचालकांना किंवा त्यांच्या नातेवाईकाना कर्जे/अग्रिमराशी किंवा कंत्राटे देतेवेळी वरील मार्गदर्शक तत्वांचे पालन केले जावे.
२.२.१.१३ दुय्यम कंपन्यांचे संचालक/म्युच्युअल फंड/व्हेंचर कॅपिटल फंडांचे ट्रस्टी व इतर बँकांचे संचालक ह्यांना कर्जे व अग्रिम राशी देताना तसेच कंत्राटे देतानाही बँकांनी ह्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे.

२.२.१.१४ ही मर्गदर्शक तत्वे सर्व संचालकांच्या नजरेस आणावीत तसेच ती त्या बँकेच्या संचालक मंडळापुढेही ठेवली जावीत.

### २.२.२ बँकांच्या अधिकाऱ्यांना व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नातेवाईकांना कर्जे व अग्रिम राशी देण्यावरील निर्बंध

२.२.२.१ सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे अधिकारी किंवा कर्मचारी ह्यांना लागु होणारे वैधानिक विनियम आणि/किंवा नियम व अटी, असे अधिकारी किंवा कर्मचारी व त्यांचे नातेवाईक ह्यांना कर्ज सुविधा देताना पाळावयाच्या सावधानता, काही मर्यादेपर्यंत दर्शवितात. ह्याशिवाय, असे अधिकारी किंवा कर्मचारी व त्यांचे नातेवाईक ह्यांना कर्जसुविधा देण्यासंबंधाने, सर्व बँकांनी पुढील मार्गदर्शक तत्वांचे पालन करणे आवश्यक आहे.

१) बँकेच्या अधिकाऱ्यांना कर्जे व अग्रिम राशी
कोणताही अधिकारी, किंवा एखादा अधिकारी सभासद असलेली कोणतीही समिती, इतर बाबींसह, एखाद्या कर्ज सुविधेसाठी मंजुरी देण्याचा अधिकार वापरताना, त्याच्या/तिच्या नातेवाईकाला कोणतीही कर्जसुविधा मंजुर करणार नाही. सर्वसाधारणतः अशी सुविधा केवळ त्यानंतरच्या उच्चतर मंजुरी - प्राधिकरणाद्वारे मंजुर केली जाईल. वित्तपुरवठा करणाऱ्या बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना मंजुर केलेल्या कर्जसुविधा संचालक मंडळाला कळविल्या गेल्या पाहिजेत.

२) बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नातेवाईकांना कर्जे व अग्रिम राशी तसेच कंत्राटे देणे
सुयोग्य प्राधिकरणाने मंजुर केलेले, बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नातेवाईकांना द्यावयाच्या कर्ज-सुविधांचे प्रस्ताव संचालक मंडळाला कळविले जावेत. ह्याशिवाय, संचालक मंडळसोडून अन्य प्राधिकरणाने पुढील बाबतीत कर्जसुविधा दिली असल्यास, असा व्यवहार मंडळाला कळविला जावा -

- वित्तपुरवठा करणाऱ्या बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या कोणत्याही नातेवाईकाचा बराचसा हितसंबंध असलेली किंवा तो तिचा भागीदार किंवा हमीदार आहे अशी कंपनी; किंवा
- अशी कोणतीही कंपनी की जिच्यामध्ये, वित्तपुरवठा करण्याऱ्या बँकेच्या कोणत्याही अधिकाऱ्याचा लक्षणीय हितसंबंध आहे किंवा तो त्यात संचालक किंवा हमीदाता आहे.

२.२.२.२ कर्ज सुविधा देण्याबाबतचे वरील निकष, कंत्राटे देण्याबाबतही समानतेने लागु होतील.

२.२.२.३ बँका एकत्र येऊन (कॉन्सॉर्टियम) केलेल्या व्यवस्थेला ही मार्गदर्शक तत्वे लागु करणे.

कॉन्सॉर्टियम व्यवस्थेच्या बाबतीत, बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नातेवाईकांना कर्जसुविधा देण्याबाबतचे वरील निकष, सहभागी असलेल्या सर्व बँकांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नातेवाईकांनाही लागु होतील.

२.२.२.४ काही संज्ञांची व्याप्ती

१) "नातेवाईक" ह्या संज्ञेची व्याप्ती, परिच्छेद २.२.१.७ मध्ये निर्देशित केल्यानुसार असेल.

२) "वरिष्ठ अधिकारी" ही संज्ञा पुढील बाबतीत लागु होईल.

अ) एखाद्या राष्ट्रीयीकृत बँकेमधील, श्रेणी ४ मधील, वरिष्ठ व्यवस्थापन स्तरावरील कोणताही अधिकारी, आणि

ब) पुढीलप्रमाणे असलेला सममूल्य वेतनश्रेणीमधील वरिष्ठ अधिकारी -

- भारतीय स्टेट बँक व तिच्या सहकारी बँकांमधील, आणि
- भारतात इनकॉर्पोरेट झालेल्या कोणत्याही बँकिंग कंपनीमधील

३) "कर्जसुविधा" ह्या संज्ञेमध्ये, पुढील बाबींविरुध्द दिलेली कर्जे व अग्रिम राशींना समावेश केला जाणार नाही -

अ) सरकारी प्रतिभूती
ब) जीवन विमा पॉलिसीज्
क) स्थिर किंवा अन्य ठेवी
ड) छोट्या रकमांसाठी, म्हणजे रु २५०००/- पर्यंत दिलेली ओव्हरड्राफ्ट्स
ई) एकावेळी रु ५०००/- पर्यंत केलेली चेक्सची अनौपचारिक खरेदी.

४) अधिकाऱ्यांसाठी लागु असलेल्या सर्वसाधारणतः कोणत्याही योजनेखाली बँकेच्या अधिकाऱ्याला, गृहकर्ज, कार ॲडव्हान्स, वस्तु विकत घेण्याची कर्जे ह्यासारखी कर्जे व अग्रिम राशींचा कर्ज सुविधांमध्ये समावेश होणार नाही.

५) "लक्षणीय हितसंबंध" ह्या संज्ञेचा अर्थ, बँकिंग रेग्युलेशन अधिनियम,१९४९ च्या कलम ५ (एनई) मध्ये दिल्यानुसारच असेल.

२.२.२.५ ह्या संदर्भात बँकांनी इतर बाबींबरोबर -

१) वित्तपुरवठा करणाऱ्या बँकेच्या मंडळ समितीसमोर किंवा सुयोग्य प्राधिकरणासमोर ठेवलेल्या कोणताही कर्ज प्रस्ताव/कंत्राट देणे ह्यामध्ये, त्या बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या नातेवाईकांच्या हितसंबंधाबाबत खात्री करुन घेण्यासाठी बँकांनी एक कार्यरित तयार करावी

२) प्रत्येक कर्जदाराकडून पुढीलप्रमाणे एक घोषणापत्र घ्यावे -

अ) तो एक व्यक्ती असल्यास, तो त्या बँकेच्या कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्याचा विहित केलेला किंवा जवळचा नातेवाईक नाही.
ब) ती जर भागीदारीची एचयुएफ कंपनी असल्यास, तिच्या भागीदारापैकी किंवा त्या एचयुएफच्या कोणीही व्यक्ती, त्या बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याचा विहित केलेला किंवा जवळचा नातेवाईक नाही. आणि
क) ती एक संयुक्त स्टॉक कंपनी असल्यास, तिच्या संचालकापैकी कोणीही, त्या बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याचा विहित किंवा जवळचा नातेवाईक नाही.

३) अशा घोषणापत्रात, वित्तपुरवठा करणाऱ्या बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याशी त्या कर्जदाराचे असलेल्या नात्याची माहिती दिली गेली आहे ह्याची खात्री करुन घ्यावी.

४) कोणतीही कर्जसुविधा देण्यासाठी अट घालण्यात यावी की, कर्जदाराने वरील संबंधाने दिलेले घोषणापत्र खोटे असल्याचे दिसून आल्यास ती कर्ज सुविधा आवाहित करण्याचा/कर्ज रक्कमेची परतफेड करण्यास सांगण्याचा बँकेला अधिकार आहे.

५) ह्या मार्गदर्शक त्स्त्वांची अंमलबजावणी करता यावी ह्यासाठी, त्यांच्या कायदेशीर सल्लागारांचा सल्ला घेऊन, बँकेच्या अधिकाऱ्यांच्या सेवेबाबतच्या अटींशी संबंधित असलेले विनियम, नियम ह्यात सुधारणा केल्या जाव्यात.

**२.२.३ ओझोन डिप्लिटिंग पदार्थ (ओडीएस) निर्माण करणाऱ्या/वापरणाऱ्या उद्योगांना वित्तसहाय्य देण्यावरील निर्बंध**

२.२.३.१ - भारत सरकारने सांगितले हे की, भारताचा सहभाग असलेल्या मॉंट्रियल प्रोटोकॉल अनुसार, ओझोन डिप्लिटिंग पदार्थांचे उत्पादन, त्यात दिलेल्या वेळापत्रकानुसार कमी करत न्यावयाचे आहे. मॉंट्रियल प्रोटोकॉलच्या **जोडपत्र १ व २** मध्ये दिलेली रसायनांची यादी ह्यासोबत दिली आहे. ह्या प्रोटोकॉलने मुख्य ओडीएस निश्चित केला असून, त्यांचे उत्पादन/वापर कमी करण्याबाबत कालमर्यादा ठरविली असून कालांतराने ते पूर्णपणे बंद कराव्याचे आहे. भारतामध्ये ओडीएस कमी-कमी करणाचे प्रकल्प, मल्टिलॅटरल फंडामधून अनुदान मिळविण्यास पात्र आहेत. ह्या फेजआउट कार्यक्रमामधील क्षेत्रे खाली दिली आहेत.

| **क्षेत्र** | **पदार्थांचा प्रकार** |
|---|---|
| फोमचे उत्पाद | क्लोरो-फ्लुओरोकार्बन - ११ (सीएफसी - ११) |
| रेफ्रिजरेटर्स व एअर कंडिशनर्स | सीएफसी — १२ |
| एरोसॉल उत्पाद | सीएफसी - ११ व सीएफसी — १२ ची मिश्रणे |
| स्वच्छता करणाऱ्या पदार्थांमधील द्रावके (सॉल्वेंट्स इन क्लीनिंग ॲप्लिकेशन्स) | सीएफसी - ११३ कार्बन टेट्राक्लोराईड मेथिल क्लोरोफॉर्म |
| अग्निशामक | हॅलॉन्स -१२११,१३०१,२४०२ |

२.२.३.२ वरील ओडीएस उत्पादन करणारी/वापरणारी नवीन एकके स्थापन करण्यासाठी बँकांनी वित्तपुरवठा करु नये. तेव्हाच्या इंडास्ट्रियल डेवलपमेंट बँक ऑफ इंडियाने दिलेल्या परिपत्रक क्र. एफआय/१२/९६-९७ दि फेब्रवारी १६, १९९६ अनुसार, सीएफसीचा वापर करुन एरोसॉल निर्माण करणाऱ्या लघु/मध्यम एककांना कोणतेही अर्थसहाय्य केले जाऊ नये व त्या क्षेत्रातील प्रकल्पाला मदत म्हणून कोणतेही पुनर्वित दिले जाऊ नये.

**२.२.४ सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोल (एससीसी) खाली संवेदनशील मालाविरुध्द अग्रिम राशी देण्यावरील निर्बंध**

२.२.४.१ निदेश देणे

१) बँकेच्या कर्जाच्या सहाय्याने अत्यावश्यक मालाचा सट्टेगिरीसाठी साठा केला जाणे व परिणामी त्यांच्या भावातील दरवाढ रोखण्यासाठी, बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या कलम २१ व ३५ अ ने दिलेल्या अधिकारांचा वापर करुन, आणि जनहिताच्या दृष्टीने असे करणे आवश्यक आहे ह्याबाबत समाधान झाल्याने, रिझर्व बँक, सर्व वाणिज्य बँकांना राशी देण्याबाबत निर्बंध घालत असते.

२) सर्व साधारणतः संवेदनशील समजले जाणारे माल पुढीलप्रमाणे आहेतः-

अ) धान्य, म्हणजे डाळी व कडधान्ये

ब) देशात पिकलेल्या निवडक तेलबिया, उदा - भुईमूग, रेपसीड/मोहरी, सरकी, जवस आणि एरंड त्यांची तेले, वनस्पती व सर्व आयात तेले व वनस्पतीजन्य तेले

क) कच्चा कापुस व कपास

ड) साखर/गूळ/खांडसरी

ई) सुती कापड, सुतासह, मानवनिर्मित धागे व विणण्याचे धागे आणि मानवनिर्मित धाग्यांपासून तयार केलेले कापड आणि अंशतः कापसाचे धागे व अंशतः मानवनिर्मित धागे ह्यापासून तयार केलेले कापड.

२.२.४.२ सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोल मधून सध्या वगळलेला माल

(१) सध्या, सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोलच्या सर्व वैधानिक अटींबाबत पुढील मालांना सूत देण्यात आली आहेः-

| अनुक्रमांक | माल | कधीपासून सूट देण्यात आली |
|---|---|---|
| १. | डाळी | २१.१०.१९९६ |
| २. | इतर धान्ये (उदा. कोर्स ग्रेन्स) | २१.१०.१९९६ |

| | | |
|---|---|---|
| ३. | तेलबिया (उदा. भुईमुग, रेपसीड/मोहरी, सरकी, जवस, एरंडीच्या बिया) | २१.१०.१९९६ |
| ४. | तेले (उदा. शेंगदाणा तेल, तिळाचे तेल, मोहरीचे तेल, सरकीचे तेल, जवसाचे तेल, एरंडीचे तेल) वनस्पति सह | २१.१०.१९९६ |
| ५. | आयात केलेल्स सर्व तेलबिया व तेले | २१.१०.१९९६ |
| ६. | आयात साखरेसह साखर - बफर स्टॉक, व साकर कारखान्याती वितरण न केलेला साठा सोडून | २१.१०.१९९६ |
| ७. | गूळ आणि खांडसरी | २१.१०.१९९६ |
| ८. | कापूस व कपाशी | २१.१०.१९९६ |
| ९. | भात/तांदूळ | १८.१०.१९९४ |
| १०. | गहू * | १२.१०.१९९३ |
| * ८.४.९७ ते ७.७.९७ पर्यंत एससीसीखाली तात्पुरता समाविष्ट. | | |

ह्या संवेदनशील मालाविरुध्द अग्रिम राशी देण्याबाबत प्रुडेंशियल मार्गिन निश्चित करण्याचे स्वातंत्र्य बँकांना आहे.

२.२.४.३ सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोलखाली असलेला माल

१) सध्या, सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोलच्या वैधानिक अटींखाली असलेला माल पुढीलप्रमाणे आहेः

अ) साखर कारखान्यांमधील साखरेचा बफर स्टॉक
ब) साखर कारखान्यातील वितरण न केलेला पुढील प्रकारचा साठा-

- लेव्ही साखर आणि
- मुक्त विकण्याची साखर

२.२.४.४ सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोलच्या वैधानिक अटी

१) साखरेवरील मार्जिन

| माल | किमान मार्जिन | ह्या तारखेपासून |
|---|---|---|
| (अ) साखरेचे बफर स्टॉक्स | ०% | ०१.०४.१९८७ |
| (ब) पुढील प्रकारच्या साखरेचे साखर कारखान्यातील वितरण न केलेले साठेः<br>• लेव्ही साखर आणि<br>• मुक्त विकण्याची साखर | <br>१०%<br>@ | <br>२२.१०.१९९७<br>१०.१०.२००० |

@ वाणिज्य अंदाज/निर्णयावर आधारित, मुक्त विकण्याच्या साखरेसाठी असलेल्या कर्जावरील मार्जिन, आरआरबी व एलएबी सह बँकांद्वारे ठरविले जाईल.

२) साखरेच्या साठ्यांचे मूल्यांकन

अ) साखर कारखान्यांनी प्रतिभूती म्हणून बँकांकडे ठेवलेल्या अवितरित साखरेच्या साठ्यांचे मूल्यांकन, सरकारने ठरविलेल्या लेव्ही मूल्याने केले जाईल.
ब) साखर कारखान्यांनी बँकेकडे प्रतिभूती म्हणून ठेवलेल्या साखरेच्या बफर साठ्यांसह, मुक्त विकण्याच्या साखरेच्या वितरण न केलेल्या साठ्यांचे मूल्यांकन, गेल्या तीन महिन्यात असलेल्या भावांच्या सरासरी दराने (चलत् सरासरी) किंवा सध्याचा बाजार भाव ह्यापैकी जो कमी असेल त्या दराने केले जाईल आणि ह्याबाबतचे भाव एक्साईज शुल्कशिवाय असतील.

३) व्याजदर
सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोलखाली येणाऱ्या मालांसाठी घेतलेल्या कर्जाचे व्याजदर ठरविण्याचे स्वातंत्र्य बँकांना आहे.

४) इतर कार्यकारी अटी
अ) इतर कार्यकारी अटींमध्ये मालानुसार बदल होईल. एखाद्या विशिष्ट संवेदनशील मालासाठी सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोल पुनः लागु करण्यात येतात तेव्हा ह्या अटी लागु केल्या जातात.
ब) सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोलखाली असलेल्या एकमेव मालाला (म्हणजे, बफर साठे व साखर कारखान्यांकडे असलेले लेव्ही/मुक्त साखरेचे वितरण न केलेले साठे) ह्यांना आधीच्या अटी लागु होत नसल्या, तरीहि त्या जोडपत्र ३ मध्ये देण्यात आल्या आहेत. ह्याचे कारण म्हणजे, बँकांना ह्याची जाणीव करुन देणे की, सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोलखाली असलेल्या मालाचा व्यापार करणाऱ्या त्यांच्या ग्राहकांना कोणत्याही कर्जसुविधा दिल्या जाऊ नयेत. अन्यथा त्यामुळे ह्या निदेशांचा उद्देशच असफल होईल.

५) अधिकार देणे
अ) सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोलखाली असलेल्या संवेदनशील मालांसंबंधीच्या कर्ज प्रस्तावांच्या मंजुरी देण्यासाठी अधिकार दिले जाण्याबाबत पुनरावलोकन करण्यात आले असे ठरविण्यात आले की, सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोलखाली, रु १ कोटीपेक्षा अधिक रकमेचे कर्जप्रस्ताव, पूर्वमंजुरीसाठी रिझर्व बँकेकडे पाठविण्याची सध्याची रीत बंद करण्यात यावी आणि ह्याबाबत,

बँकांना त्यांच्या-त्यांच्या कर्जधोरणानुसार ती कर्जे मंजुर करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. त्यानुसार, संवेदनशील मालाचा व्यापार करणाऱ्या कर्जदारांचे रु १ कोटीपेक्षा अधिक रकमेचे कर्जप्रस्ताव, आता भारतीय रिझर्व बँकेकडे तिच्या पूर्वपरवानगीसाठी पाठविण्याची आवश्यकता नाही.

### २.२.५ अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांना कमिशन देण्यावरील निर्बंध

बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९३४ च्या कलम १०(१)(ब)(२) मधील अटीनुसार, कोणतीही बँकिंग कंपनी, अशा कोणत्याही व्यक्तीला नोकरी देणार नाही किंवा नोकरी सुरु ठेवणार नाही की जिचे मानधन किंवा मानधनाचा भाग कमिशनचे स्वरुप घेईल किंवा कंपनीच्या नफ्यामध्ये तिचा भाग असेल. ह्याशिवाय, कलम १०(१)(ब)(२) अनुसार, नियमित कर्मचारी सोडून नेमलेल्या अन्य व्यक्तीला कमिशन देण्याची परवानगी आहे. ह्यासाठी, कर्जांची वसुली करण्यासाठी बँकांनी त्यांचे कर्मचारी व अधिकारी ह्यांना कमिशन देऊ नये.

## २.३ इतर कर्जे व अग्रिम राशींवरील निर्बंध

### २.३.१ शेअर्स, डिबेंचर व बाँड्सविरुध्द कर्जे व अग्रिम राशी

शेअर्स, डिबेंचर व बाँड्सविरुध्द कर्जे व अग्रिम राशी देताना बँकांनी पुढील परिपत्रकांमधील विनियमात्मक निर्बंध पाळणे आवश्यक आहे- “बँक फायनान्स अगेन्स्ट शेअर्स अँड डिबेंचर्स” वरील दि. २८, १९९८ चे महापरिपत्रक ह्यासह “एक्सपोझर नॉर्म्स” वरील जुलै १, २००९ चे महापरिपत्रक आणि जून ७, २००५ चे विदेशी कंपन्यामधील इक्विटी मिळविण्यासाठी वित्तपुरवठा ह्यावरील परिपत्रक इतर बाबींसह, शेअर्स व डिबेंचर्सच्या विरुध्द कर्जे व अग्रिम राशी देण्याबाबतचे निर्बंध पुढीलप्रमाणे आहेतः

- अंशतः पैसे भरलेल्या शेअर्सविरुध्द कोणतीही कर्जे दिली जाणार नाहीत.
- शेअर्स व डिबेंचर्सची प्राथमिक सिक्युरिटीविरुध्द भागीदार/मालकी असलेल्या कंपन्यांना कोणतीही कर्जे दिली जाणार नाहीत.

### २.३.२ मनी मार्केट म्युच्यअल फंड्स

भारतीय रिझर्व बँकेने, मनीमार्केट म्युच्युअल फंडांवर (एमएमएमएफ) घातलेली सर्व मार्गदर्शक तत्वे मागे घेण्यात आली असून, ह्याबाबत बँकांनी सेबीच्या मार्गदर्शक तत्वांचे मार्गदर्शन घ्यावे. तथापि, एमएमएमएफ  स्थापन करण्यास इच्छुक असलेल्या बँका/वित्तसंस्था ह्यांनी, नोंदणीसाठी सेबीकडे जाण्यापूर्वी, हे अतिरिक्त काम करण्याबाबत रिझर्व बँकेची आवश्यक ती परवानगी घेतली पाहिजे.

### २.३.३ इतर बँकांनी देलेल्या स्थिर ठेवीच्या पावत्यां (एफडीआर) च्या विरुध्द अग्रिम राशी

अशाही घटना घडल्या आहेते की जेथे बँकांकडून अग्रिम राशी मिळविण्यासाठी अन्य बँकांनी मुदत ठेवीसाठी देलेल्या खोट्या पावत्यांचा उपयोग करण्यात आला होता. अशा घटना पाहता बँकांनी इतर बँकांच्या एक डीआर किंवा मुदत ठेवीच्या पावत्यांविरुध्द अग्रिम राशी मंजूर करु नयेत.

### २.३.४ ठेवींना चालना देण्यावर आधारित, एजंट/मध्यस्थ ह्यांना अग्रिम राशी

विद्यमान/भावी कर्जदारांच्या कर्ज – गरजा पूर्ण करण्यासाठी, एजंट/मध्यस्थ ह्यांच्या मार्फत स्त्रोत निर्माण करण्याच्या अनैतिक रीती अवलंबिण्यापासून किंवा ठेवींना त्यांनी दिलेली चालना विचारात घेऊन अशा मध्यस्थांना कर्जे देण्यापासून दूर रहावे कारण त्यांना त्यांच्या खऱ्या उद्योगधंधासाठी अशा कर्जांची गरज असेलच असे नाही.

### २.३.५ ठेवी - प्रमाणपत्रांविरुध्द (सीडी) कर्जे

बँका सीडीविरुध्द कर्जे देऊ शकत नाहीत. ह्याशिवाय, त्यांना त्यांच्या स्वतःच्याच सीडी परिपक्व होण्यापूर्वी त्यांची पुनर्खरेदी करण्यास परवानगी नाही. आढावा घेतल्यानंतर, केवळ म्युच्युअल फंडांनी धारण केलेल्या सीडींच्या बाबतीतच, पुढील सूचना दिली जाईपर्यंत, कर्ज देणे व पुनर्खरेदी वरील हे निर्बंध शिथिल करण्याचे ठरविण्यात आले. म्युच्युअल फंडांना अशी कर्जे देताना, बँकांनी, सेवी (म्युच्युअल फंड्स) विनियम, १९९६ च्या परिच्छेद ४४ (२) मधील तरतुदी नजरेसमोर ठेवाव्यात. ह्याशिवाय, असे वित्तसहाय्य इक्विटी अभिमुख म्युच्युअल फंडांना दिले गेल्यास, तो बँकेच्या भांडवल बाजार जोखीमचा एक भागच ठरेल.

### २.३.६ अबँकीय वित्त कंपन्यांना (एनबीएफसी) बँकेचे वित्तसहाय्य

ह्याबाबत, बँकांना, अबँकीय वित्त कंपन्याना बँकेचे वित्तसहाय ह्यावरील जुलै १, २००९ चे महापरिपत्रक मार्गदर्शक ठरेल.

### २.३.७ पायाभूत सोयी/गृहप्रकल्प ह्यांना वित्तसहाय्य

२.३.७.१ <u>गृहवित्त</u>
ह्याबाबत बँकांनी, दि. जुलै १, २००९ च्या, गृह वित्तावरील महापरिपत्रकाचा संदर्भ घ्यावा.

२.३.७.२ <u>पायाभूत सोयी प्रकल्पांना वित्तसहाय्य करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे</u>
पायाभूत सोयी क्षेत्राचे गंभीर महत्व आणि विविध पायाभूत सोयींच्या सेवा क्षेत्राच्या विकासाला दिलेले प्राधान्य विचारात घेऊन, बाबींचे, भारत सरकारच्या सल्ल्यानुसार पुनरावलोकन करण्यात आले असून, पायाभूत सोयी प्रकल्पांना द्यावयाच्या वित्तसहाय्यावरील मार्गदर्शक तत्वे पुढीलप्रमाणे सुधारित करण्यात आली आहेतः

२.३.७.३ <u>"पायाभूत सोयींना कर्ज" ची व्याख्या</u>

धनकोंनी (म्हणजे, बँक, वित्तसंस्था, एनबीएफसी) पायाभूत सोयी क्षेत्राला, कोणत्याही स्वरुपात देऊ केलेली, खालील प्रकारे असलेली कर्जसुविधा "पायाभूत सोयींना कर्ज" ह्या व्याख्येत समाविष्ट आहे दुसऱ्या शब्दात, पुढील कर्जदारांना उपलब्ध करुन दिलेली कर्ज सुविधा - एखाद्या पायाभूत सोयीचे

- विकास करणे किंवा

- चालवणे व परिरक्षण करणे किंवा
- पुढीलपैकी कोणत्याही क्षेत्रात, एक प्रकल्प म्हणून असलेल्या कोणत्याही पायाभूत सुविधेचे किंवा त्याच स्वरुपाच्या कोणत्याही पायाभूत सुविधेचे विकास करणे, चालविणे व परिक्षण करणेः-

१) पथकर रस्त्यासह एखादा रस्ता, पूल किंवा रेल्वे प्रणाली
२) महामार्ग प्रकल्प, त्या महामार्ग प्रकल्पाचा महत्वाचा भाग असलेल्या कार्यकृतींसह
३) बंदर, विमानतळ, इनलँड वॉटरवे किंवा इनलँड पोर्ट.
४) पाणीपुरवठा प्रकल्प, सिंचन प्रकल्प, जलप्रक्रिया प्रणली स्वच्छता - मलानिःसारण प्रणाली किंवा धन कचरा व्यवस्थापन प्रणाली.
५) मूलभूत किंवा सेल्युलर दूर संचार सेवा - रेडियो पेजिंग, डोमेस्टिक सॅटेलाईट सेवा (म्हणजे, भारतीय कंपनीच्या मालकीचा किंचा तीची देखभाल असलेला, दूर संचार सेवा देणारा उपग्रह), ट्रंकिंग नेटवर्क, ब्रॉडबँड नेटवर्क व इंटरनेट सेवा ह्यासह.
६) औद्योगिक पार्क किंवा स्पेशल इकॉनॉमिक झोन
७) विद्युत ऊर्जा निर्माण किंवा निर्माण व वितरण
८) पारेषण किंवा वितरणसाठी नवीन लाईन्स टाकून विजेचे पारेषण किंवा वितरण
९) कृषि प्रक्रिया व कृषीसाठी इनपुट पुरविण्यासाठी संबंधित बांधकामाचे प्रकल्प.
१०) प्रक्रिया केलेला कृषि माल, नाशवंत माल (फळे, भाज्या, फुले) ह्यांच्या संरक्षणासाठी व साठविण्यासाठी बांधकाम तसेच दर्जासाठी परीक्षण सुविधा.
११) शैक्षणिक संस्था व इस्पितळे ह्यांचे बांधकाम
१२) गॅस, क्रूड तेल व पेट्रोल ह्यासाठी पाईपलाईन्स टाकणे व त्यांचे अनुरक्षण
१३) ह्याच स्वरुपाची दुसरी कोणतीही पायाभूत सुविधा.

२.३.७.४ <u>वित्तसहाय्य करावयाचे निकष</u>

सार्वजनिक क्षेत्र किंवा खासगी क्षेत्र अशा दोन्हीही क्षेत्रांनी करावयास घेतलेल्या, तांत्रिकदृष्ट्या शक्य, वित्तदृष्ट्या सफलक्षम व बँकसहाय्यक्षम अशा प्रकल्पांना वित्तसहाय्य करण्याचे स्वातंत्र्य बँक/वित्तसंस्थांना आहे. मात्र त्यासाठी पुढील अटी आहेतः-
१) मंजुर केलेली रक्कम ही, आरबीआयने, पायाभूत सोयींच्या वित्तसहाय्याबाबत विहित केलेल्या प्रुडेन्शियल जोखीम निकषांच्या सर्वंकष मर्यादेमध्ये असावी.
२) तांत्रिक दृष्ट्या शक्यता, वित्त दृष्ट्या सफलक्षमता ब बँक - सहाय्य क्षमता व विशेषतः जोखमी -विश्लेषण ह्याबाबतीत प्रकल्पांचे मूल्यांकन करण्यासाठी, त्या बँका/वित्तसंस्थांकडे पुरेसे कुशलज्ञान/अनुभव असावा.
३) सार्वजनिक क्षेत्रातिल एककांनी घेतलेल्या प्रकल्पांबाबत, केवळ कॉर्पोरेट कंपन्यांसाठीच (म्हणजे, कंपनीज् अधिनियमाखाली नोंदणीकृत सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या किंवा संबंधित कायद्याखाली स्थापन झालेली निगम) मुदत कर्जे दिली जावीत. ह्याशिवाय, अशी मुदत कर्जे, त्या प्रकल्पासाठी अंदाजपत्रकातील स्त्रोतांच्या ऐवजी किंवा बदल्यात दिली जाऊ नयेत. प्रकल्पाच्या आराखड्यात/योजनेत असे पूरक वित्तसहाय्य असल्यासच ते मुदतकर्ज, अंदाजपत्रकातील स्त्रोतांना पूरक वित्तसहाय्य म्हणून दिले जावे. सार्वजनिक क्षेत्रातील अशा एककांमध्ये, पायाभूत सोयी प्रकल्पांना अर्थ सहाय्य करण्यासाठी, कंपनीज् अधिनियमाखाली स्थापन केलेल्या स्पेशल परपज व्हेईकल्स (एसपीव्ही) चा समावेश असला तरी, बँका व वित्तसंस्थांनी खात्री करुन घ्यावी की ही कर्जे/गुंतवणुकी, राज्य सरकारांच्या अंदाजपत्रकांना अर्थसहाय्य म्हणून वापरली जाणार नाहीत. असे अर्थसहाय्य हे कर्जे देऊन किंवा बॉंड्समध्ये गुंतवणुक करुन दिलेले असले तरी, त्या प्रकल्पामधून मिळणारा वित्तप्रवाह हा, कर्ज फेडीची

दायित्वे पूर्ण करण्यास पुरेसा आहे व त्या कर्जाबाबतची परतफेड/प्रक्रिया आकार हे प्रकल्पाच्या अंदाजपत्र की स्त्रोतांमधूनच येत नाहीत. ह्याची खात्री करुन घेण्यासाठी, बँकांनी व वित्तसंस्थांनी अशा प्रकल्पांच्या सफलता क्षमतेबाबत व बँकसहाय्य क्षमतेबाबत सावधानता बाळगावी. ह्याशिवाय, एसपीव्हींना वित्तसहाय्य करण्याबाबत, बँका व वित्तसंस्थांनी खात्री करुन घ्यावी की, असे अर्थसहाय्यबाबतचे प्रस्ताव हे देखरेख करता येण्याजोग्या खास/विशिष्ट प्रकल्पांसाठीच आहेत. असे दिसून आले आहे की, काही बँकांनी राज्याच्या पीएसयुंना अर्थसहाय्य केले आहे व ते वरील निकषांना अनुसरुन नाही. ह्यासाठी, बँका/वित्तसंस्थांना सल्ला देण्यात येत आहे की, त्यांनी राज्यामधील आजारी पीएसयुंना, पुनर्वसन प्रयत्न/उपाय म्हणून त्यात बाँड्समध्ये गुंतवणुकी करतानाही वरील सूचना काटेकोरपणे पाळाव्यात.

४) कंपनीज् अधिनियमाखाली नोंदणी झालेल्या, खाजगी क्षेत्रातील एसपीव्हीना, पायाभूत सोयींचे प्रकल्प, (जे अर्थदृष्ट्या सफलताक्षम आहेत) थेट करण्यासाठी (परंतु वित्तीय मध्यस्थ म्हणून कार्य करणाऱ्या नव्हे) बँका कर्ज देऊ शकतात. बँका खात्री करुन घेऊ शकतात की मूळ/प्रायोजकाची दिवाळखोरी किंवा आर्थिक चणचण ह्यामुळे त्या एसपीव्हीच्या आर्थिक स्वास्थ्यावर परिणाम होणार नाही.

२.३.७.५ <u>बँकांद्वारे वित्तसहाय्याचे प्रकार</u>

१) पायाभूत सोयी प्रकल्पांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी बँका पुढील प्रकाराने कर्ज देऊ शकतात- कार्यकारी भांडवल वित्त, मुदत कर्ज, प्रकल्प कर्ज, प्रकल्प-वित्त पॅकेजचा एक भाग म्हणून मिळविलेले इक्विटी, बाँड्स व डिबेचर्स/प्रिफरन्स शेअर्स/ह्यात वर्गणी (सबस्क्राईब) देऊन, (ज्याला डीम्ड ॲडव्हान्स म्हटले जाते आणि निधी आधारित किंवा आधारित नसलेली सुविधा.

२) <u>टेक-आउट अर्थसहाय्य</u>

बँका, आयडीएफसी/अन्य वित्तीय संस्था ह्यांच्याबरोबर टेक-आऊट वित्तपुरवठा व्यवस्था करु शकतात किंवा आयडीएफसी/इतर वित्तसंस्थांकडून लिक्विडिटी सपोर्ट मिळवू शकतात. ह्या व्यवस्थेमधील काही महत्वाच्या गुणविशेषांबाबतची थोडक्यात माहिती परिच्छेद २.३.७.८ (१) मध्ये दिली आहे. परिपत्रक क्र. डीबीओडी.बीपी.बीसी.१४४/२१.०४.०४८/२००० दि. फेब्रुवारी २९,२००० मध्ये टेक आउट फायनान्सबाबत दिलेल्या सूचनांचे मार्गदर्शन बँका घेऊ शकतात.

३) <u>आंतर-संस्थीय हमी</u>

पायाभूत सोयींच्या प्रकल्पांबाबत, बँकांना, इतर वित्तसंस्थांच्या नावे हमी देण्यास परवानगी आहे. मात्र, ह्यासाठी, हमी देणाऱ्या बँकेने, त्या प्रकल्पात प्रकल्पखर्चाच्या ५ टक्के एवढा निधियुक्त भाग घेतला असला पाहिजे आणि त्या प्रकल्पाचे, सर्वसाधारण कर्ज मूल्यांकन, देखरेख व पाठपुरावा केला पाहिजे. आंतर - संस्थीय हमीच्या सविस्तार माहितीसाठी कृपया परिच्छेद २.३.८.पहा.

४) <u>प्रायोजकाच्या इक्विटीसाठी वित्तपुरवठा करणे</u>

परिपत्रक क्र. डीबीओडी. डीआयआर.बीसी ९०/१३.०७.०५/९८ दि. ऑगस्ट २८,१९९८ अनुसार बँकांना सांगण्यात आले आहे की, एखाद्या कंपनीच्या प्रायोजकाची इक्विटी भांडवलाची रक्कम त्या प्रायोजकाच्या स्वतःच्या स्त्रोतामधूनच यावयास हवी तसेच बँकांनी इतर कंपन्यांचे शेअर्स घेण्यासाठी, सर्वसाधारणतः अग्रिम राशी देऊ नयेत. पायाभूत सोयी क्षेत्राला दिल्या गेलेले महत्व विचारात घेता असे ठरविण्यात आले आहे की, भारतामध्ये एखाद्या पायाभूत सोयींचा

प्रकल्प स्थापन करणाऱ्या किंवा सुरु असलेल्या व विद्यमान कंपनीमधील प्रायोजकाने शेअर्स मिळविण्याबाबत, काही विशिष्ट परिस्थितीत ह्या धोरणाला अपवाद केला जावा. असा अपवाद करण्याबाबत अटी पुढीलप्रमाणे आहेतः-

१) बँकेने केलेले वित्तसहाय्य हे, फक्त वरील परिच्छेद (अ) मध्ये दिल्यानुसार, पायाभूत सोयी पुरविणाऱ्या विद्यमान कंपनीचे शेअर्स मिळविण्यासाठीच असेल. ह्याशिवाय, असे शेअर्स मिळविणे हे केवळ अशा कंपन्यांबाबत असेल की जेथे विद्यमान विदेशी प्रायोजक, (आणि/किंवा देशांतर्गत संयुक्त प्रायोजक) सेबी मार्गदर्शक तत्वांच्या अनुसार (लागु असेल तसे) त्यांच्या शेअर्सच्या बहुतेक भागांची स्वतःहून निर्गतवणुक करतील.
२) कर्जे दिलेल्या कंपन्यांचे निव्वळ मूल्य (नेट वर्थ) समाधानकारक असावे.
३) अर्थ सहाय्य केलेली कंपनी आणि अशा कंपन्यांचे प्रायोजक/संचालक हे बँका/वित्तसंस्थांचे थकबाकीदार(डिफॉल्टर्स) नसावेत.
४) त्या पायाभूत सोयी कंपनीमध्ये कर्जदाराचा लक्षणीय भाग (स्टेक) आहे ह्याची खात्री करुन घेण्यासाठी, मिळविण्याच्या कंपनीमधील प्रायोजकाचा भाग मिळविण्यासाठी, बँकेचे वित्तसहाय्य, गरज असलेल्या वित्ताच्या ५० % पर्यंतच सीमित ठेवावे.
५) दिलेले अर्थसहाय्य हे कर्जदार कंपनीच्या ॲसेट्सविरुध्द किंवा मिळविलेल्या कंपनीच्या ॲसेट्सविरुध्द असावे, परंतु त्या कंपनीच्या शेअर्स विरुध्द नसावे. कर्जदार कंपनी/मिळवावयाची कंपनी ह्यांचे शेअर्स अतिरिक्त प्रतिभूती म्हणून स्वीकारले जावेत, परंतु प्राथमिक प्रतिभूती म्हणून न्व्हेत. बँकांकडे गहाणवट ठेवलेल्या प्रतिभूती पणनीय असाव्यात.
६) वैधानिक अटींनुसार ठरविलेल्या मार्जिन्स सर्वदा तशाच ठेवल्या जातील ह्याची बँकांनी खात्री करुन घ्यावी.
७) बँकांच्या कर्जाचा कालावधी सात वर्षांपेक्षा अधिक नसावा. तथापि, त्या प्रकल्पाच्या आर्थिक सफलक्षमतेसाठी, काही विशिष्ट बाबतीत बँकांची संचालक मंडळे अपवाद करु शकतात.
८) बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या कलम १९(२) च्या आवश्यकता पूर्ण केल्या गेल्यासच असा वित्तपुरवठा केला जाईल.
९) प्रायोजकांद्वारे इक्विटी शेअर्स मिळाविण्यासाठी अर्थसहाय्य करणाऱ्या बँकांनी, त्या बँकांच्या भांडवली बाजाराशी असलेल्या सर्व प्रकारच्या एकूण जोखमींसाठी (निधी आधारित व आधारित नसलेल्या), मागील वर्षाच्या ३१ मार्च रोजी असलेल्या त्यांच्या निव्वळ मूल्याच्या ४० % विनियामक मर्यादेत असावे.
१०) बँकेच्या वित्तसहाय्यासाठी असलेल्या प्रस्तावाला संचालक मंडळाची मंजुरी असावी.

२.३.७.६. <u>मूल्यामापन</u>

१) सरकारी मालकीच्या संस्थांनी घेतलेल्या पायाभूत सोयींच्या प्रकल्पांच्या बाबतीत, बँका/वित्तसंस्थांनी त्या प्रकल्पांच्या सफलतेक्षमतेबाबत खात्री करण्यासाठी प्रयास घ्यावेत. बँकांनी खात्री करुन घ्यावी की, अर्थ सहाय्याबाबतचा व त्याच्या परतफेडीबाबतचा प्रत्येक मुद्दा/घटक स्पष्ट असून त्याचे मूल्यमापन व्यवस्थित करण्यात आले आहे. राज्य सरकारांच्या हमी ह्या समाधानकारक कर्ज-मूल्यमापनासाठी धरल्या जाऊ नयेत. आणि अशा प्रकारच्या मूल्यमापनाच्या आवश्यकता, भारतीय रिझर्व बँक किंवा अन्य कोणतीही बँक ह्यांच्याबरोबर असलेल्या व्यवस्थांच्या आधारावर, त्या कर्जावर/बंधपत्रांवर प्रक्रिया करण्यासाठी, नियमित स्थायी सूचना/नियतकालिक प्रदान सूचना ह्यासाठी शिथिल केल्या जाऊ नयेत.

२) पायाभूत सोयींच्या प्रकल्पांना बहुशः स्पेशल परपज व्हेईकल्स मधूनच अर्थसहाय्य केले जाते. ह्यामुळे अशा प्रकल्पांना अर्थसहाय्य करण्यासाठी कर्ज देणाऱ्या संस्थांना विशेष अशी मूल्यमापन कौशल्ये असणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या मूल्यमापनातील महत्वाच्या बाबी म्हणजे, प्रकल्पासमोरील निरनिराळे धोके, प्रकल्पासाठी दिलेली कंत्राटे, कंत्राटदारांची आर्थिक विश्वसनीयता, आणि दिलेली कंत्राटे, पूर्ण मधील त्यांची विश्वसनीयता ह्यांचे मूल्यमापन. ह्या बाबतीत, बँका/वित्तसंस्था, कर्ज प्रस्तावाचे मूल्यमापन करण्यासाठी व त्या प्रकल्पांची प्रगती/कामगिरी ह्यावर देखरेख ठेवण्यासाठी सुयोग्य अशा छाननी समित्या/विशेष कक्ष स्थापन करु शकतात. बहुतेक वेळा, अर्थसहाय्याचे आकारमान असे असते की त्यासाठी बँका/वित्तसंस्थांचे संयुक्त अर्थसहाय्य किंवा कम्सोर्टियमखाली अनेक बँकांचे किंवा त्यांच्या सिंडिकेटची मदत लागत असते. अशा बाबतीत, सहभागी बँका/वित्तसंस्था मूल्यमापनसाठी मुख्य (लीड) बँकेने/वित्तसंस्थेने तयार केलेल्या मूल्यमापन अहवालाचा संदर्भ घेऊ शकतात किंवा संयुक्तपणे त्या प्रकल्पाचे मूल्यमापन करु शकतात.

२.३.७.७ प्रुडेन्शियल आवश्यकता

१) प्रुडेन्शियल कर्ज - जोखीम मर्यादा

एखाद्या गटातील कर्जदारांना दिलेल्या कर्जांची जोखीम, त्या बँकेच्या भांडवली निधीच्या ४० टक्के ह्या जोखीम मापदंडापेक्षा १० टक्के अधिक (म्हणजे ५० % पर्यंत) जाऊ शकते. मात्र असे अतिरिक्त कर्ज जोखीम ही पायाभूत सोयी प्रकल्पांना द्यावयाच्या कर्जाचा विस्तार (एक्सटेन्शन) असावा. एकमेव कर्जदाराला दिलेल्या कर्जाची जोखीम त्या बँकेच्या भांडवली निधूच्या १५ टक्के ह्या जोखीम मापदंडापेक्षा ५ टक्के अधिक (म्हणजे २० टक्के पर्यंत) असू शकते. मात्र ही अतिरिक्त कर्ज जोखीम वरील परिच्छेद (अ) मध्ये दिल्यानुसार पायाभूत सोयी प्रकल्पांसाठीसावी. वरील जोखमींच्या अतिरिक्त, अपवादात्मक बाबतीत, त्यांच्या संचालक मंडळाच्या मंजुरीने, बँका, त्या कर्जदाराला, त्यांच्या भांडवलीनिधीच्या ५ टक्के अतिरिक्त कर्ज जोखीम देण्याचा विचार करु शकतात. त्या वर्षात प्रुडेन्शियल जोखीम मर्यादा बँकेने ओलांडली असल्यास, जोखमींच्या बाबतीत वार्षिक वित्तीय विवरणपत्रातील "नोट्स ऑन अकाउंट्स" मध्ये, बँकांनी सुयोग्य असे प्रकटीकरण करावे.

२) कॅपिटल ॲडेक्वसीसाठी जोखीम भार देणे

कॅपिटल ॲडक्वसीच्या बाबतीत बँकांनी, प्रुडेन्शियल गाईडलाईन्स ऑन कॅपिटल ॲडेक्वसी अँड मार्केट डिसिप्लीन - इंप्लिमेंटेशन ऑफ न्यू कॅपिटल ॲडेक्वसी फ्रेमवर्क द्वारे दिलेल्या व वेळोवेळी सुधारित केलेल्या सूचनाण्चे मार्गदर्शन घ्यावे.

३) ॲसेट - लायाबिलिटी व्यवस्थापन

पायाभूत सोयींच्या प्रकल्पांना दीर्घकालीन वित्तसहाय्य केल्यामुळे, ॲसेट - लायाबिलिटीमध्ये असमतोल (न जुळणे) निर्माण होऊ शकतो - विशेषतः असे वित्तसहाय्य, बँकेच्या जबाबदाऱ्यांच्या मॅच्युरिटी प्रोफाइलला धरुन नसल्यास. अशा प्रकल्पांना कर्ज दिल्याकारणाने, लिक्विडीटी - असमतोल (मिसमॅच) होणार नाही ह्याची खात्री करुन घेण्यासाठी बँकांनी त्यांच्या ॲसेट - लायाबिलिटी स्थितीवर करडी नजर ठेवावी.

४) प्रशासकीय व्यवस्था

पायाभूत सोयींच्या प्रकल्पांची यशस्वी अंमलबजावणी होण्यासाठी वेळेवर व पुरेसे अर्थसहाय्य मिळन्याची आवश्यकता असते. ह्यासाठी बँका/वित्तसंस्थांनी, कर्जप्रस्तावांच्या मंजुरीसाठी स्पष्ट अशा कार्यरीती राहिलेल्या अर्जांसाठी सुयोग्य अशी देखरेख यंत्रणा राबवावी. वित्तसहाय्य करणाऱ्या प्रत्येक संस्थेने, परिणामी होऊ शकणारी अशी बहुविध मूल्यमापने टाळावीत, आणि अग्रगण्य अशा सार्वजनिक वित्तसंस्थांनी तयात केलेल्या तांत्रिक मापदंडांचा स्वीकार करण्यास बँकांनी तयार व्हावे. तसेच, प्रकल्पाच्या अंमलबजावणीवर सातत्याने देखरेख ठेवणारी यंत्रणा तयार केल्याने, दिलेले कर्ज, ते मंजुर केलेल्या कामासाठीच वापरले जात आहे. ह्याची खात्री करता येईल.

२.३.७.८ टेक-आउट वित्तसहाय्य/लिक्विडीटीसाठी सहाय्य

१) टेक-आऊट वित्तसहाय्य करण्याची व्यवस्था

मूलतः, टेक-आऊट वित्तसहाय्य रचना ही एक यंत्रणा असून, ती, पायाभूत सोयी प्रकल्पांना दीर्घ मुदतीची कर्जे दिल्याकारणाने निर्माण होऊ शकणारे ॲसेट - लायाबिलिटी परिपक्वतेबाबतचे असमतोल टाळण्यासाठी बँकांना मदत करण्यासाठी तयार करण्यात आली आहे. ह्या व्यवस्थेखाली, पायाभूत सोयी प्रकल्पांना वित्तसहाय्य करणाऱ्या बँका, आयडीएफसि किंवा इतर कोणत्याही वित्तसंस्थेबरोबर, पूर्व-नियोजित धर्तीवर, त्यांच्या पुस्तकातील थकबाकी, तिच्याकडे हस्तांतरित करण्याची व्यवस्था करु शकतात. निरनिराळ्या बँकांच्या आवश्यकतांनुसार, आयडीएफसी व एसबीआय ह्यांनी, लिक्विडीटी, ॲसेट-लायाबिलिटीमधील असमतोल, प्रकल्पाच्या मूल्यांकनासाठी उपलब्ध असलेली सीमित कौशल्ये, अशा प्रश्नांसंबंधाने निरनिराळ्या टेक-आउट फायनांसिंग रचना तयार केल्या आहेत. तसेच त्यांनी विशिष्ट प्रकल्पांसाठी, इतर कर्जांच्या कागदपत्रांसह उपयुक्त ठरेल असा आदर्श करारनामाही तयार केला आहे. एसबीआय व आयडीएफसी ह्यांच्या दरम्यान केलेला करारनामा, इतर बँकांसाठी, आयडीएफसी किंवा अन्य वित्तसंस्थांबरोबर करावयाच्या तत्सम व्यवस्थांसाठी संदर्भ म्हणून ठरु शकतो.

२) आयडीएफसीकडून लिक्विडिटी सहाय्य

टेक-आऊट वित्तसहाय्य संरचनेला एक पर्याय म्हणून, आयडीएफसी व एसबीआय ह्यांनी बँकांना लिक्विडिटी सहाय्य करण्यासाठी एक उत्पाद तयार केला आहे. ह्या योजनेखाली, आयडीएफसी, मंजुरी देतेवेळी, बँकांना एका संमत कालावधीनंतर (समजा पाच वर्षे), संपूर्ण कर्जाच्या किंवा त्या कर्जाच्या भागाच्या थकबाकीचे (मुदल + थकलेले व्याज) पुनर्वित्त देण्याचे वचन देईल. ह्या प्रकल्पावरील कर्जजोखीम संबंधित बँकवर असेल, आयडीएफसीवर नाही. ती बँक, ठरविलेली अटींनुसार ही रक्कम आयडीएफसीला व्याजासकट परत करेल. अशा बँकेबाबत, आयडीएफसी कर्जजोखीम घेत असल्याकारणाने, पुनर्वित्त म्हणून दिलेल्या रकमेवर आकारावयाचा व्याजदर हा, आयडीएफसीच्या त्या बँकेबाबतच्या जोखमी-दृष्टीवर अवलंबून असेल. (बहुतेक बाबतीत तो व्याजदर आयडीएफसीच्या पीएलआरच्या जवळपास असू शकेल). आयडीएफसीने दिलेल्या अशा पुनर्वित्ताचा लाभ, विशेषतः आवश्यक ती मूल्यमापन कौशल्ये व त्या प्रकल्पाला निधीपुरवठा करण्याची क्षमता असलेल्या बँकांना होऊ शकतो.

## २.३.८ वित्तसंस्थांच्या नावे बँक हमी देणे

२.३.८.१ इतर बँका/वित्तसंस्था/इतर कर्जदायी एजन्सी ह्यांनी दिलेल्या कर्जांसाठी, बँका त्यांच्या नावे हमी देऊ शकतात. मात्र त्यासाठी पुढील अटींचे काटेकोरपणे अनुपालन झाले असले पाहिजेः-

१) संचालक मंडळाने बँकेच्या जोखीम व्यवस्थापना प्रणालींची एकात्मता/सशक्तता ओळखून त्यानुसार ह्याबाबत व्यवस्थित धोरण आखलेले असावे. संचालक मंडळाने मंजुरी दिलेल्या धोरणात, इतर बाबींसह पुढील बाबींचा विचार केला जावा-

अ) इतर बँका/वित्तसंस्था/इतर कर्जदायी संस्था ह्यांच्या नावे हमी देता येतील अशा, त्या बँकेच्या टियर - १ भांडवलाच्या प्रुडेन्शियल मर्यादा.

ब) प्रतिभूती व मार्जिन्स प्रकार व व्याप्ति.

क) अधिकार दिले जाणे.

ड) अहवाल पाठविण्याची प्रणाली.

ई) नियतकालिक समालोचन.

२) अशी हमी केवळ कर्जदार घटकांना व इतर बँका/ वित्तसंस्था/कर्जदायी संस्था ह्यांच्याकडून त्यांना अतिरिक्त कर्ज सुविधा मिळविण्यासाठी दिली जाईल.

३) हमीदाता बँक, हमी दिलेल्या जोखमीच्या किमान १०% निधीयुक्त जोखीम घेईल.

४) फेमाखाली परवानगी दिलेल्या सवलतींसाठी सोडल्यास, बँकांनी विदेशी धनकोंना हमी किंवा लेटर्स ऑफ कंफर्ट (विदेशी धनकोंना देता येण्याजोगी धरुन) देऊ नयेत.

५) बँकेने दिलेली हमी ही, ति हमी ज्याच्या वतीने दिली गेली आहे त्या कर्जदारावरील जोखीम असेल आणि विद्यमान मार्गदर्शक तत्वांनुसार तिला योग्य तो जोखीमभार दिला जाईल.

६) ह्या क्षेत्रामधील फसवणुक टाळण्यासाठी, बँकांनी घोष समितीच्या शिफारशी व हमी देण्याबाबतच्या अन्य अंतर्गत आवश्यकतांचे पालन करावे.

२.३.८.२ः <u>कर्जदायी बँका</u>

अ) इतर बँका/वित्तसंस्था ह्यांच्या द्वारे दिल्या गेलेल्या हमींविरुध्द कर्जसुविधा देऊ करणाऱ्या बँकांनी पुढील अटींचे काटेकोरपणे पालन केले असले पाहिजे-

१) अन्य बँक/वित्तसंस्था ह्यांनी दिलेल्या हमीविरुध्द एखाद्या बँकेवर असलेली जोखीम ही, ती हमी देणाऱ्या बँके/वित्तसंस्थेवरील जोखीम समजली जाईल व त्यावर, विद्यमान मार्गदर्शक तत्वांनुसार जोखीमभार लागु होईल.

२) इतर बँकांनी दिलेल्या हमींच्या विरुध्द दिलेल्या कर्जांमुळे आलेल्या जोखमी, संचालक मंडळाने विहित केलेल्या आंतर बँकीय जोखीम मर्यादांच्या आत असाव्यात. अन्य बँक/वित्तसंस्था ह्यांनी दिलेल्या हमींविरुध्द बँकांना आलेल्या जोखमी, मनी मार्केट, विदेशी मुद्रा मार्केट व सिक्युरिटी मार्केट ह्यामधील आंतर बँकीय व्यवहारांच्या कालावधीपेक्षा अधिक कालासाठी असल्याकारणाने, अशा जोखमींबाबत अधिक धोका असल्याने, संचालक मंडळाने, दीर्घकालीन जोखमींसाठी योग्य अशी उप-मर्यादा ठरवून द्यावी.

३) हमीदाता बँक/ वित्तसंस्थांवरील जोखमीवर बँकांनी सतत लक्ष देत असावे आणि त्यांच्या संचालक मंडळाने विहित केलेल्या प्रुडेन्शियल मर्यादा/उपमर्यादा, तसेच आरबीआयने वित्तसंस्थांसाठी विहित केलेल्या एकमेव कर्जदाराबाबतच्या मर्यादांचे काटेकोरपणे पालन होत असल्याची खात्री करुन घ्यावी.

४) ह्या क्षेत्रातील फसवणुक टाळण्यासाठी, बँकांनी, घोष समितीच्या शिफारशी व अन्य बँकांच्या हमी स्वीकारण्याबाबतच्या अंतर्गत आवश्यकतांचे अनुपालन करावे.

ब) तथापि वरील अटी पुढील प्रकरणांना लागु होणार नाहीत:-
अ) पायाभूत सोयींच्या प्रकल्पांबाबत, बँका, इतर कर्जदायी संस्थांच्या नावे हमी देऊ शकतात. मात्र ह्यासाठी, हमीदाता बँकेने, त्या प्रकल्पात, त्या प्रकल्प खर्चाच्या ५ % एवढा निधीयुक्त भाग घेतला असला पाहिजे आणि त्या प्रकल्पाचे पतमूल्यांकन, देखरेख व पाठपुरावा केला पाहिजे.
ब) इंडियन रिन्युएबल एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सी, नॅशनल हॉर्टिकल्चर बोर्ड इत्यादि निरनिराळ्या विकास एजन्सी/बोर्डांच्या नावे, हमीदेणे, कार्यक्षमता, उत्पादनशलिता वाढविण्यासाठी, अशा एजन्सीज/बोडाकडून, सॉफ्ट लोन्स, आणि/किंवा इतर स्वरुपांचे विकास सहाय्य मिळाविणे. मात्र ह्यासाठी पुढील अटी लागु होतील-

- तांत्रिक सुसाध्यता, वित्तीय सफलक्षमता आणि बँक सफलक्षमता ह्याबाबत तसेच/किंवा कर्ज प्रस्तावाच्या बाबत, प्रत्येक प्रकल्पासाठी, बँकांनी पतमूल्यांकनाच्या आधारावर स्वतःची खात्री करुन घ्यावी. म्हणाजे, अशा मूल्यांकनांचा दर्जा, मुदत-वित्त/कर्जाच्या मंजुरीसाठी असलेल्या मूल्यांकन - दर्जाप्रमाणेच असावा.
- एकमेव कर्जदार/कर्जदारांचा गट ह्यांच्यासाठी वेळोवेळी विहित केलेल्या प्रुडेन्शियल जोखीम मानदंडांचे अनुपालन बँकांनी करावे.
- हुडको/राज्य गृहनिर्माण मंडळे व तत्सम संस्था ह्यांच्या नावे, त्यांनी स्वच्छ, पणनीय अशी शीर्षक मालमत्तेला देऊ न शकणाऱ्या कर्जदारांना दिलेल्या कर्जाबाबत हमी देणे. मात्र अशा वेळी ती कर्जे योग्य रितीने परत करतील ह्याबाबत बँकांचे समाधान झाले असले पाहिजे.

ड) तात्पुरत्या लिक्विडिटी निर्बंधांमुळे पुनर्वसन योजनांमध्ये भाग घेण्यास असमर्थ असलेल्या कॉन्सॉर्टियमच्या सभासद बँकांद्वारे, त्या मर्यादे, मधील भाग उचलणाऱ्या बँकांच्या नावे हमी दिली जाणे.

क) आरबीआयने खास परवानगी दिल्याशिवाय, बँकांनी, आयडीबीआय, एसआयडीबीआय, एक्झिम बँक,पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन (पीएफसी) किंवा अन्य कोणत्याही वित्तसंस्थांनी सुरु केलेल्या बायर्स लाईन ऑफ क्रेडीट योजनांमध्ये सहस्वीकार/ हमी बाबतच्या सुविधा देऊ नयेत.

**२.३.९ बँकांद्वारे बिलांचे डिस्काउंट/रिडिस्काउंट केले जाणे.**

खऱ्याखुऱ्या वाणिज्य/व्यापारी बिलांची खरेदी/डिस्काउंट/निगोशिएटिंग/रिडिस्काउंट करतेवेळी बँकांनी पुढील मार्गदर्शक तत्वांचे अनुसरण करावेः-

१) कर्जदारांच्या भांडवली मर्यादांचे मूल्यांकन/मंजुरी करण्याबाबत स्वतःचीच मार्गदर्शक तत्वे करण्याचे स्वातंत्र्य बँकांना दिले गेले असल्याने, त्या, कर्जदारांच्या कर्ज गरजांचे योग्य असे

मूल्यामापन केल्यानंतर आणि त्यांच्या संचालक मंडळाने मंजुर केलेल्या कर्ज धोरणानुसार कार्यकारी भांडवल मर्यादा तसेच बिलांची मर्यादा मंजुर करु शकतात.

२) बँकांनी, त्यांच्या संचालक मंडळाने मंजुर केलेले, स्पष्ट असे बिल डिस्काउंटिंग धोरण ठरवावे. आणि ते धोरण, कार्यकारी भांडवल मर्यादा मंजुर करण्याच्या धोरणाशी सुसंगत असावे. ह्या बाबतीत, संचालक मंडळाच्या कार्यरीतींमध्ये, ती बिले सादर केल्याच्या वेळेपासून ती वसुल होईपर्यंतची, त्या बँकेची मूलभूत (कोअर) कार्यकारी प्रक्रिया समाविष्ट केलेली असावी. बिलांबाबतच्या वित्तसहाय्यबाबत, बँका त्यांच्या कोअर ऑपरेटिंग प्रक्रियेचे पुनरावलोकन करुन ती अधिक सुलभ करु शकतात. अनेक वेळा आढळणाऱ्या, बिलांच्या वसुली होण्याबाबत विलंब होण्याबाबत प्रश्नावर उपाय म्हणून, बँका, स्ट्रक्चर्ड फायनान्शियल मेसेजिंग सिस्टिम (एसएफएमएस) ह्यासारख्या सुधारित कॉम्प्युटर/कम्युनिकेशन नेटवर्कची मदत घेऊन, त्यांच्या ग्राहकांच्या खात्यांच "व्हॅल्यु डेटिंग" करण्यची प्रणाली स्वीकारु शकतात.

३) बँकांनी,ज्यांना नियमित कर्ज सुविधा दिलेल्या आहेत अशाच कर्जदार ग्राहकांच्या बाबतीत आणि अस्सल वाणिज्य व व्यापारी व्यवहारांसाठीच पतपत्रे (एलसी) उघडावीत आणि बिलांची खरेदी/डिस्काउंटिंग/निगोशिएशन्स केवळ पतपत्रांखालीच करावी. ह्यासाठी, बँकांनी, निधी आधारित (बिल फायनान्सिंग सह) किंवा निधी आधारित नसलेल्या, म्हणजे, पतपत्रे उघडणे, हमी व स्वीकार देणे इत्यादि सुविधा, ग्राहक नसलेल्यांना कर्जदारांना किंवा कन्सॉर्टियम/बहुविध बँक-व्यवस्था असलेल्या सभासदांना देऊ नयेत. तथापि, जेथे एलसीखाली काढलेल्या बिलांचे निगोशिएशन एखाद्या विशिष्ट बँकेशी संबंधित असेल, आणि एखाद्या एलसीचा लाभार्थी हा त्या बँकेचा ग्राहक नसेल, तेथे संबंधित बँक असे एलसी निगोशिएट करु शकते. मात्र त्यासाठी, त्यामधील रक्कम/उत्पन्न त्या लाभार्थीच्या नेहमीच्या/नियमित बँकेकडे पाठविले गेले पाहिजे. तथापि, ग्राहक नसलेल्यांच्या अनियंत्रित एलसीचे निगोशिएशनवरील मनाई जारीच राहील.

४) कधीकधी त्या एलसीचा लाभार्थी, ती एलसी देणाऱ्या बँकेकडेच बिले डिस्काउंट करावयाचा विचार करु शकतो. अशा बाबतीत, बँकेने त्या लाभार्थीला नियमितपणे निधी आधारित कर्जसुविधा मंजुर केल्या असल्यासच बँका त्या लाभार्थीने काढलेली बिले डिस्काउंट करु शकतात. लाभार्थीच्या बँकेत कॅश-फ्लोचा तूटवडा पडणार नाही ह्याची खात्री करुन घेण्यासाठी, त्या लाभार्थीने त्याच्या बिलांचे डिस्काउंटिंग/निगोशिएशन, त्याला ज्या बँकेकडून कर्जसुविधा मंजुर झाल्या आहेत त्याच बँकेमार्फत करावे.

५) एलसीखाली खरेदी/डिस्काउंट/निगोशिएट केलेली बिले (जेथे लाभार्थीला "अंडर रिझर्व" खाली प्रदान केलेले नसते) ही एलसी देणाऱ्या बँकेवरील जोखमी समजली जाईल-लाभार्थीवरील नव्हे. वर निर्दिष्ट केलेल्या सर्व स्वच्छ निगोशिएशन्सना, कॅपिटल ॲडेक्वसीसाठी, आंतर बँकीय जोखमीना लागु असलेला जोखीमभार लागु पडेल. "अंडर रिझर्व" प्रकारच्या निगोशिएशन्ससाठी, ती जोखीम कर्जदारावरील जोखीम समजली जाईल व त्यानुसार जोखीमभार लागु होईल.

६) एलसीखाली किंवा अन्यथा बिले खरेदी/डिस्काउंट/निगोशिएट करताना बँकांनी त्यामधील व्यवहार/कागदपत्रे अस्सल/खरी असल्याची खात्री करुन घ्यावी.

७) कोरे चेक्स/डिमांड ड्राफ्ट्स इत्यादि ठेवले जातात त्याच प्रमाणे बँकांनी एलसीचे फॉर्म्सदेखील सुरक्षित ठिकाणी ठेवावेत व दररोज त्यांची शिल्लक तपासावी. ग्राहकाना दिलेल्या एलसी फॉर्म्सवर बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या संयुक्त सह्या असाव्यात.

८) "विदाउट रिकोर्स" प्रकारची बिल्स ऑफ एक्सचेंज काढणे आणि "विदाउट रिकोर्स" असे लिहिलेली पतपत्रे देणे ह्यास प्रोत्साहन देऊ नये. कारण, वाटाघाटी करणाऱ्या बँकांचा रिकोर्सबाबतचा, निगोशिएबल इंस्ट्रुमेंट्स अधिनियमाखालील हक्क, अशा निगोशिएशन्समुळे हिरावून घेतेला जातो. ह्यासाठी बँकांनी, "विदाउट रिकोर्स" खंड असलेल्या एलसी उघडू नयेत "विदाउट रिकोर्स" खंड असलेली बिले खरेदी/डिस्काउंट/निगोशिएट करु नयेत. पुनरावलोकन केल्यानंतर असे ठरविण्यात आले आहे की, बँका त्यांच्या दूरदृष्टीनुसार व ती एलसी देणाऱ्या बँकेच्या पतविश्वासाच्या आधारावर, "विथ रिकोर्स" किंवा "विदाउट रिकोर्स" धर्तीवर असलेल्या एलसीखालील बिले निगोशिएट करु शकतात. तथापि, "विदाउट रिकोर्स" धर्तीवरील इतर बिलांच्या (एलसीखाली सोडून अन्यथा काढलेली बिले) खरेदी/डिस्काउंटिंगसाठी असलेले निर्बंध जारी असणे सुरुच राहील.
९) बँकांनी अकोमडेशन बिलांची खरेदी/डिस्काउंटिंग/निगोशिएशन करु नये. त्याबाबत असलेले व्यावहार स्पष्टपणे समजावून घ्यावेत आणि बिलांचा व्यवहार करणाऱ्या शाखांमध्ये त्याबाबत योग्य रेकोर्ड ठेवले जावे.

१०) मोठ्या औद्योगिक गटांनी स्थापन केलेल्या फ्रंट फायनान्स कंपन्यांनी, इतर कंपनीगटांवर काढलेली बिले डिस्काउंट करताना बँकांनी दक्षता ठेवावी.

११) बिलांचे रिडिस्काउंटिंग इतर बँकांनी धारण केलेल्या युजन्स बिलांपुरतेच सीमित असावे. हलक्या वाणिज्य वाहनांच्या बिलांचा अपवाद सोडल्यास, बँकांनी, अबँकीय वित्तकंपन्यांनी आधी रिडिस्काउट केलेली बिले रिडिस्काउंट करु नयेत.

१२) सेवा क्षेत्रांच्या बिलांचे डिस्काउंटिंग करताना बँकांनी त्यांच्या वाणिज्य दूरदृष्टीचा उपयोग करावा. तथापि, अशी बिले डिस्काउंट करताना, प्रत्यक्ष सेवा दिली गेली असून, अकोमडेशन बिलांचे डिस्काउंटिंग करण्यात आले नाही ह्याची बँकांनी खात्री करुन घ्यावी. सेवाक्षेत्राची बिले रिडिस्काउंट करण्यास पात्र नाहीत. ह्याशिवाय, सेवा क्षेत्राची बोले डिस्काउंट केल्यावर त्याविरुध्द अर्थसहाय्य उपलब्ध करुन देणे हे अ-प्रतिभूतीयुक्त अग्रिम राशी म्हणून समण्यात येईल. आणि त्यामुळे असे करणे हे, बँकेच्या संचालक मंडळाने विहित केलेल्या मापदंडाच्या आत असावे.-

१३) बिलांचा स्वीकार काही प्रमाणावर वाढविण्यास लागणाऱ्या शिस्तीला प्रोस्ताहन देण्यासाठी, त्या बँकाच्या संचालक मंडळाने ठरविलेल्या सीमा स्तरापेक्षा अधिक उलाढाल असलेल्या सर्व कॉर्पोरेट व इतर ग्राहकांना, बँकेला सादर केलेल्या त्यांच्या देय थकबाकीचे "एजिंग शेड्युल" देणे अनिवार्य करावे.

१४) डिस्काउंट/रिडिस्काउंट केलेल्या बिलांचा तारण (कोलॅटरल) म्हणून वापर करुन बँकांनी रेपो व्यवहार करु नयेत.

### २.३.१० बुलियन/प्रायमरी गोल्ड विरुध्द अग्रिम राशी

अ) बँकांनी, बुलियन/प्रायमरी गोल्ड विरुध्द अग्रिमराशी देऊ नयेत.
ब) सिलव्हर बुलियन डिलर्सना अग्रिमराशी देणे बँकांनी टाळावे कारण त्याच्या उपयोग सट्टेगिरीसाठी केला जाऊ शकतो.

## २.३.११ सोन्याचे दागिने व जडजवाहिराविरुध्द अग्रिमराशी

सुवर्ण अलंकारांवर उमटविलेला हॉलमार्क, त्या अलंकारांमध्ये वापरलेल्या सोन्याचे वजन, शुध्दता व सूक्ष्मता ह्यांची खात्री करुन देतो. ह्यासाठी, अशा हॉलमार्क असलेल्या दाग-दागिन्यांवर अग्रिमराशी देणे बँकांना अधिक सुरक्षित व सुलभ ठरेल. अशा हॉलमार्कयुक्त दागिन्यांमुळे होणाऱ्या अशा लाभामुळे, दागिन्यांवर हॉलमार्क करण्याची प्रथा, ग्राहक, धनको व उद्योग ह्यांच्या दीर्घकालीन हितासाठी उपयुक्त ठरेल. ह्यासाठी, दागिन्यांवर अग्रिम राशी देण्याचा विचार करताना, बँकांनी हॉलमार्कयुक्त दागिन्यांचा फायदा विचारात घेऊन त्याबाबतचे मार्जिन व व्याजदर ठरवावा.

## २.३.१२ सोने (धातु) विरुध्द कर्ज

२.३.१२.१ विद्यमान सूचनांनुसार सोने आयात करण्यास नेममेल्या बँका, (बँकांनी यादी जोडपत्र ४ मध्ये) दागदागिन्यांचे निर्यातदार नसलेल्या, देशांतर्गत दागिने निर्माण करणारांना सुवर्ण (धातु) कर्जे देऊ शकतात. मात्र, अशा बाबतीत, अशा प्रकारचे कोणतेही सुवर्ण कर्ज किंवा त्यांनी देशांतर्गत सुवर्णअलंकार निर्मात्यांना सुवर्णकर्जे देण्यासाठी देलेली व निधीयुक्त नसलेली आश्वासने, निर्यात न करण्यासाठी असलेल्या एकूण कर्जांच्या बाबतीत असलेल्या सर्वसमावेशक मर्यादेसाठी विचारात घेतली जातील. अलंकारांच्या निर्यातदारांना दिलेली सुवर्णकर्जे ही २५% मर्यादेच्या आत असणे सुरुच राहील. बँकांनी दिलेल्या सुवर्ण (धातु) कर्जांना पुढील अटी लागु होतीलः-

१) अलंकारांचे निर्यातदार नसलेल्या देशंतर्गत अलंकार निर्मात्यांना, सुवर्ण (धातु) कर्जे देण्याची परवानगी असलेल्या प्राधिकृत बँकांनी द्यावयाच्या सुवर्ण कर्जांची मुदत अशा प्राधिकृत बँकांनी स्वतःच ठरवावयाची आहे. मात्र ह्यासाठी, अशी मुदत १८० दिवसांपेक्षा अधिक नसावा आणि मुदत व सुवर्ण कर्जाच्या अंतिम उपयोगावरील देखरेख ह्यांचे धोरण ह्यांची बँकेच्या कर्जधोरणामध्ये नोंद झालेली असावी व बँकेकडून त्याचे काटेकोरपणे पालन केले जावे. वरील मार्गदर्शक तत्वांचे मिळालेल्या अनुभवांनुसार पुनरावलोकन केले जावे आणि सुवर्ण कर्जांच्या अंतिम उपयोगांवरील देखरेखीबाबतची बँकेची कामगिरी, हा, सोने/चांदी आयात करण्याबाबतच्या वार्षिक नूतनीकरणाऱ्या विनंतीबाबत निर्णय घेण्यासाठी एक महत्वाचा घटक ठरेल.
२) कर्जदारांना आकारले जाणारे व्याज, आंतरराष्ट्रीय सुवर्ण व्याजदराशी जोडलेले/त्यानुसार असावे.
३) सुवर्ण कर्जे ही नेहमीच्या राखीव-निधी-आवश्यकतांवर आधारित असावीत.
४) अशा कर्जाला कॅपिटल ॲडेक्वसी व इतर प्रुडेंशियल आवश्यकता लागु होतील.
५) सुवर्ण अलंकार निर्मात्यांना दिलेल्या सुवर्ण कर्जांच्या अंतिम उपयोगांबाबत बँकांनी खात्री करुन घ्यावी व केवायसी निकषांचे पालन करावे.
६) सुवर्ण कर्जे व कर्जे ह्यामधून असमतोल (मिसमॅच) निर्माण झाल्यास तो त्या प्राधिकृत बँकेच्या संचालक मंडळाने मंजुर केलेल्या प्रुडेंशियल जोखीम मर्यादांच्या आत असावा.

७) सुवर्ण कर्जे देण्यामधील सर्वंकष जोखमींचे बँकांनी काळजीपूर्वक मूल्यमापन करुन त्यांच्या संचालक मंडळाच्या मंजुरीने एक सविस्तर कर्जधोरण तयार करावे.

२.३.१२.२ - सध्या, नामनिर्देशित बँका, इतर वाणिज्य बँकांचे ग्राहक असलेल्या व दागिन्यांचे निर्यातदार असलेल्या ग्राहकांना, त्यांच्या बँकांनी, नामनिर्देशित बँकांच्या नावे दिलेले स्टँडबाय पतपत्र किंवा बँक गॅरंटी स्वीकारुन सुवर्ण (धातु) कर्ज देऊ शकतात. मात्र त्यासाठी प्राधिकृत बँकेचे स्वतःचे कर्ज देण्याबाबतचे निकष व आरबीआयने घातलेल्या अटींचे पालन केले असले पाहिजे. ही सुविधा, देशांतर्गत अलंकार निर्मात्यांना, बँका पुढील अटींवर देऊ शकतातः-

१) स्टँडबाय एलसी/बीजी, केवळ देशांतील सुवर्ण उत्पादकांच्या वतीनेच दिले जाईल आणि ते सर्वदा ह्या संस्थांनी सोन्यांच्या कर्जाऊ घेतलेल्या पूर्ण मूल्याएवढे असेल. अनुसूचित वाणिज्य बँकांनी दिलेले असे स्टँडबाय/बीजी, केवळ नामनिर्देशित बँकांच्या नावेच (यादी जोडपत्रार दिली आहे) दिले जाईल. व सोन्याची आयात करण्याची परवानगी असलेल्या अन्य कोणत्याही संस्थेच्या नावे नाही.
२) स्टँडबाय एलसी/बीजी (फक्त देशांतर्गत क्रेडिट/बँक हमी) देणाऱ्या बँकेने, केवळ कर्जाबाबतचे मूल्यामापन केल्यावरच तसे करावे. बँकेने खात्री करुन घ्यावी की, सोन्याच्या बाजारभावातील चढउतारानुसार, नेहमीच योग्य ते मार्जिन उपलब्ध असेल.
३) स्टँडबाय एलसी/बीजीच्या सुविधा केवळ भारतीय रुपयांमध्ये धरल्या जातील-- विदेशी मुद्रेमध्ये नव्हे.
४) नामनिर्देशित नसलेल्या बँकांनी दिलेल्या स्टँडबाय एलसी/बीजीला विद्यमान ॲडेक्वसी व प्रुडेंशियल मापदंड लागु होतील.
५) स्टँडबाय एलसी/बीजी देणाऱ्या बँकानी ह्या सुविधा देण्यामधील सर्वंकष जोखमींचे काळजीपूर्वक मूल्यमापन करावे आणि त्यांच्या संचालक मंडळाच्या मंजुरीने सविस्तर कर्जधोरणे तयार करावे.

२.३.१२.३ नामनिर्देशित बँका, अलंकार निर्यातदारांना पुढील अटींवर सुवर्ण (धातु) कर्जे देणे सुरु ठेवू शकतात :-

- अन्य बँकेच्या स्टँडबाय एलसी/बीजी विरुध्द सुवर्ण (धातु) कर्ज देणाऱ्या नामनिर्देशित बँकेने घेतलेली जोखीम समजली जाईल आणि त्यावर विद्यमान मार्गदर्शक तत्वांनुसार योग्य तो जोखीमभार लागु होईल.
- असा व्यवहार केवळ बॅक-टु-बॅक धर्तीवर केलेला असावा. म्हणजे, नामनिर्देशित नसलेल्या बँकेने तिच्या ग्राहकाला दिलेल्या स्टँडबाय एलसी/बीजी विरुध्द, नामनिर्देशित बँकेने, त्या ग्राहकालाच सुवर्ण (धातु) कर्ज द्यावे.
- अशा सुवर्ण (धातु कर्जांमध्ये कर्जदार संस्थेच्या, विदेशी सुवर्ण पुरवठेदाराच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दायित्वाचा समावेश असू नये.
- सोन्यासाठी असलेला लंडन एएम/युएस डॉलर मधील दराची आरबीआयने घोषित केलेल्या रुपया-डॉलर संदर्भ दराबरोबर तुलना/रुपांतरण करुन, सोन्याच्या आकारमानाचे रुपयांमध्ये रुपांतरण करुन, बँका त्यांची जोखमी तसेच प्रुडेंशियल मापदंडाचे पालन दररोज काढू शकतात.

२.३.१२.४. बुलियनविरुध्द कर्ज देण्यासाठी विद्यमान धोरणात कोणताही बदल नाही. सुवर्ण (धातु) कर्जे देतांना तसेच एसबीएलसी/बीजी देताना बँकांनी त्यातील सर्वंकष जोखमी

ओळखल्या पाहिजेत. ह्या बाबतीत बँकांनी सुयोग्य असे जोखीम व्यवस्थापक/कर्ज धोरण तयार केले पाहिजे आणि ह्या क्षेत्रातील फसवणुकीची शक्यता टाळण्यासाठी, घोष समितीच्या शिफारशी, व इतर बँकांच्या हमी स्वीकारण्यासंबंधीच्या इतर अंतर्गत आवश्यकतांचे पालन केले पाहिजे.

२.३.१२.५ नामनिर्देशित बँकांना, सोने/सोन्याची नाणी ह्यांची फुटकळ विक्री करण्यासाठी, अबँकीय वित्त कंपन्या/सहकारी बँका/नामनिर्देशित नसलेल्या बँका ह्यासह कोणत्याही संस्थेशी सहकार्य (टायअप)/बांधिलकी करण्यास परवानगी नाही.

## २.३.१३ रियल इस्टेट क्षेत्राला कर्जे व अग्रिम राशी देणे

रियल इस्टेटशी सबंधित कर्ज प्रस्तावांचे मूल्यमापन करताना, बँकांनी खात्री करुन घ्यावी की, कर्जदारांनी त्या प्रकल्पासाठी त्या सरकार/स्थानिक सरकारे/ इतर वैधानिक प्राधिकरणे ह्यांच्याकडून आवश्यक ती पूर्वपरवानगी घेतली आहे. ह्यामुळे कर्ज-मंजुरीच्या प्रक्रियेत अडचणी येऊ नयेत ह्यासाठी, नेहमीच्या रितीने प्रस्ताव मंजुर केले जावेत परंतु त्या कर्ज रकमांचे वाटप मात्र, कर्जदाराने सरकारी प्राधिकरणांकडून आवश्यक त्या परवानग्या/ना-हरकती मिळविल्यावरच केले जावे.

## २.३.१४ लघु उद्योगांसाठी कर्जे व अग्रिम राशी

बँक प्रणालींकडून रु ५ कोटींची कार्यकारी भांडवल मर्यादा मिळालेल्या लघु उद्योगांना, त्यांच्या प्रक्षेपित वार्षिक उलाढालीच्या २० टक्के अशा धर्तीवर कार्यकारी भांडवल पुरविले जावे. सर्व लघु उद्योग एककांसाठी (नव्या व जुन्या) बँकांनी हीच सुलभ कार्यरीत अंगिकारावी.

## २.३.१५ बँक क्रेडिट देण्यासाठी कर्ज प्रणाली

अ) बँकिंग प्रणालीकडून रु १० कोटी किंवा अधिक कार्यकारी भांडवलची क्रेडिट मर्यादेचा लाभ घेणाऱ्या कर्जदारांच्याबाबत, त्यातील कर्जाचा भाग ८० टक्के असावा. तथापि, बँकांना तसे वाटाल्यास, कार्यकारी भांडवलामधील कॅश क्रेडिटचा घटक २० टक्कयांपलिकडे ठेवण्यास किंवा कर्ज - घटक ८० टक्कयांपेक्षा अधिक ठेवण्याचे स्वातंत्र्य बँकांना आहे. बँकांनी त्यांच्या कॅश व लिक्विडिटी व्यवस्थापनावर अशा निर्णयांचा होणारा परिणाम जाणून, कार्यकारी भांडवल वित्ताचे ह्या दोन घटकांचे मूल्य किती असावे ते ठरववे.

ब) रु १० कोटीपेक्षा कमी रकमेच्या कार्यकारी भांडवल वित्ताचा लाभ घेणाऱ्या कर्जदारांच्या बाबतीत, बँकांनी त्या कर्जदारांना, कॅश क्रेडिट घटकांच्या मानाने, कर्ज घटकांवर कमी व्याजदराची सवलत देऊन "लोन सिस्टिम" घेण्यास प्रवृत्त करावे. अशा बाबतीत "कर्ज घटकाची" प्रत्यक्ष टक्केवारी, बँका त्यांच्या कर्जदार ग्राहकांबरोबर ठरवू शकतात.

क) काही विशिष्ट अशा आवर्ती व मोसमी स्वरुपाच्या किंवा अंगभूतरीत्याच बदलणाऱ्या व्यवहारांबाबत, लोन सिस्टिमचा काटेकोर प्रयोग कर्जदारांसाठी अडचणीचा ठरु शकतो. बँका त्यांच्या संचालक मंडळांच्या मंजुरीने असे व्यवहार नेमकेपणाने ठरवू/ओळखू शकतील आणि त्यांना लोन सिस्टिममधून सूट देता येईल.

**२.३.१६ कन्सॉर्टियम व्यवस्था/बहुविध बँकिंग व्यवस्थेखाली कर्ज देणे**

कर्ज देण्याच्या प्रणालीमध्ये लवचिकता आणण्यासाठी तसेच कर्जप्रवाह सुरळीत ठेवण्यास ऑक्टोंबर १९९६ मध्ये भारतीय रिझर्व बँकेने, कन्सॉर्टियम/बहुवुध बँकिंगच्या कार्यरीतीं संबंधाचे निरनिराळे विनियामक निर्बंध काढून घेतले होते. तथापि, अलिकडील काळात घडलेल्या, कन्सॉर्टियम/बहुवुध बँकिंग व्यवस्थासंबंधित फसवणुकींचा विचार करुन, भारत सरकारच्या सेंट्रल व्हिजिलन्स कमिशनने, अशा कन्सॉर्टियम/बहुवुध बँकिंगद्वारा कर्ज दिले जाण्याकडे गंभीरतेने पाहिले आहे. अशा फसवणुकी मुख्यतः, कर्ज-इतिहास आणि कर्जदारांच्या निरनिराळ्या बँकांमधील खाती कशी चालविली जातात ह्याबाबतच्या माहितीचे कार्यक्षम शेअरिंग न केले गेल्याने होत असल्याचे ह्या आयोगाने म्हटले आहे.

ही बाब, इंडियन बँक्स असोशिएशनशी चर्चा करुन तपासण्यात आली असून तिच्या मते, एकापेक्षा अधिक बँकांकडून कर्जसुविधा मिळालेल्या कजदारांबाबतची माहिती शेअर केली जाण्यात सुधारणा होण्याची गरज आहे. त्यानुसार, अनेक बँकांकडून कर्जसुविधेचा लाभ घेणाऱ्या कर्जदारांबाबतची माहिती खालीलप्रमाणे मिळविण्यास बँकांना प्रोस्ताहित करण्यात येत आहेः-

१) नवीन सुविधा देतेवेळी, बँका, त्यांच्या कर्जदारांकडून, त्यांनी इतर बँकांकडून घेतलेल्या कर्ज सुविधांबाबतचे घोषणापत्र विहित नमुन्यात (संदर्भ, आरबीआयची परिपत्रके क्र. डीबीओडी क्र. बीपी.बीसी.४६/०८.१२.००१/२००८-०९ दि. सप्टेंबर १९, २००८ आणि डीबीओडी क्र. बीपी.बीसी.९४/०८.१२.००१/२००८-०९ दि. डिसेंबर ८, २००८), विद्यमान धनकोंच्या बाबतीत, सर्व बँका, रु ५.० कोटी किंवा त्यापेक्षा अधिक असे मंजुरीप्राप्त कर्ज घेतलेल्या त्यांच्या विद्यमान ग्राहकांकडून किंवा त्या ग्राहकांनी अन्य बँकांकडून कर्ज सुविधा मिळविल्या असल्याची माहिती असल्यासही, घोषणापत्र घेऊ शकतात आणि वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे, इतर बँकांबरोबर ह्या माहितीची देवाण-घेवाण करण्यासाठी एक प्रणाली सुरु करु शकतात.
२) परिणामी, बँकांनी, वरील १ मध्ये दिलेल्या, आरबीआयच्या डीबीओडी परिपत्रकांमधील जोडपत्र २ मध्ये दिलेल्या नमुन्यात, त्या ग्राहकाच्या इतर बँकांमधील खात्यांच्या कार्यरीती/कारभाराबाबतच्या माहितीची देवाण-घेवाण इतर बँकांबरोबर किमान दर तीन महिन्यांनी करावी.
३) वरील १ मध्ये दिलेल्या, तसेच डीबीओडी क्र. बीपी.बीसी. ११/०८.१२.००१/२००८-०९ दि. फेब्रुवारी १०, २००९ मध्ये दिलेल्या नमुन्यानुसार, जारी असलेल्या निरनिराळ्या वैधानिक नियमांचे पालन होत असल्याबाबत, शक्यतो, एखादा कंपनी सेक्रेटरी, चार्टर्ड अकाउंटंट किंवा कॉस्ट अकाउंटंट ह्यांच्याकडून नियमित प्रमाणपत्र घेतले जावे.
४) सिबिल कडून उपलब्ध होणाऱ्या क्रेडिट रिपोर्ट्सचा अधिक उपयोग केला जावा.

**२.३.१७ माहिती तंत्रज्ञान व सॉफ्टवेअर उद्योगांन कार्यकारी भांडवल वित्त पुरविणे.**

“नॅशनल टास्क फोर्स ऑन इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी अँड सॉफ्टवेअर डेवलपमेंट” च्या शिफारशींचे अनुपालन करण्यास रिझर्व बँकेने ह्या उद्योगाला कार्यकारी भांडवल देण्याबाबत मार्गदर्शक तत्वे तयार केली आहेत. ह्या मार्गदर्शक तत्वांचे पालन तत्वतः कर ण्याच्या हेतू न विसरता, रिझर्व बँकेचा संदर्भ घेताही, त्याच्या स्वतःच्या अनुभवांवर आधारित असे बदल ह्या मार्गदर्शक तत्वात करण्याचे स्वातंत्र्य बँकांना आहे. ह्या मार्गदर्शक तत्वांचे महत्वाचे गुणविशेष पुढीलप्रमाणे आहेतः-

१) कार्यकारी भांडवल मर्यादा मंजुर करण्यासाठी बँकानी पुढील गोष्टींचा विचार करावा -- प्रायोजक गटाशी संबंधित पूर्व कामगिरी, व्यवस्थापन गटाची संयोजना, आणि त्यांचा कामाबाबतचा अनुभव व पायाभूत सोयी.

२) रु २ कोटींपर्यंतच्या कार्यकारी भांडवल मर्यादा असलेल्या कर्जदारांसाठी, प्रक्षेपित उलाढालीच्या २० टक्कयांबाबत मूल्यमापन केले जावे. तथापि, अन्य बाबतीत, मंथली कॅश बजेट सिस्टिमच्या आधारावर/धर्तीवर, एमपीबीएफचे मूल्यमापन करण्याचा विचार बँका करु शकतात. रु १० कोटी व त्यापेक्षा अधिक रकमेच्या कार्यकारी भांडवल मर्यादा असलेल्या कर्जदारांसाठी, त्या कर्जप्रणालीसंबंधीची मार्गदर्शक तत्वे लागु होतील.

३) प्रायोजकाचे मार्जिन म्हणून बँका एका वाजवी रकमेची वैधानिक अट ठेवू शकतात.

४) उपलब्ध आहे तेथे बँका गहाणवट - प्रतिभूती मिळवू शकतात. विद्यमान (करंट) ॲसेट्सवर, प्रथम/दुसरा चार्ज उपलब्ध असल्यास मिळवू शकतात.

५) सर्वसाधारण कर्जदार वर्गाला विहित केलेला व्याजदर आकारला जावा. प्रिशिपमेंट/पोस्ट शिपमेंट क्रेडिटना लागु होणारा सवलतीचा व्याजदर आकारला जावा.

६) अशा अग्रिम राशींसाठी बँकांनी खास तयार केलेली पाठपुरावा प्रणाली तयार करावी. व्यवहारांवर देखरेख ठेवण्यासाठी, बँका, कॅशफ्लोबाबत तिमाही विवरणपत्रे मिळवू शकतात. कॅश बजेट धर्तीवर मंजुरी दिली गेली नसल्यास, बँकांनी त्यांना योग्य वाटेल अशी रिपोर्टिंग प्रणाली तयार करावी.

## २.३.१८ भारत सरकारच्या पीएसयु निर्गुंतवणुकीसाठी बँकेच्या अर्थसहाय्याबाबत मार्गदर्शक तत्वे.

२.३.१८.१ आरबीआयच्या परिपत्रक, डीबीओडी. क्र. डीआयआर. बीसी. ९०/१३.०७.०५/९८ दि. ऑगस्ट २८, १९९८ अनुसार, बँकांना सांगण्यात आले आहे की, एखाद्या कंपनीच्या इक्विटी भांडवलासाठी असलेला प्रायोजकांचा भाग हा त्यांच्या स्वतःच्याच स्त्रोतांमधून यावयास हवा आणि सर्वसाधारणतः, इतर कंपन्यांचे शेअर्स घेण्यासाठी बँकेने अग्रिमराशी देऊ नयेत. बँकांना असेही सांगण्यात आले होते की, शेअर्स विरुध्द दिलेल्या अग्रिम राशींचा उपयोग, कर्जदाराकडून कंपनी/कंपन्यांमध्ये नियंत्रक हितसंबंध मिळविण्यासाठी किवा ठेवण्यासाठी किंवा आंतरकॉर्पोरेट गुंतवणुक करण्यासाठी केला गेलेला नाही ह्याची खात्री करुन घ्यावी. येथे स्पष्ट करण्यात येत आहे की, सरकारच्या पीएसयु निर्गुंतवणुक कार्यक्रमाखाली, यशस्वी बोली लावणारांना बँकांनी वित्तपुरवठा केल्यास, त्याला १९९८ मधील वरील परिपत्रकाच्या सूचना लागु होणार नाहीत. मात्र त्यासाठी पुढील अटी असतीलः-

- पीएसयु निर्गंतवणुक कार्यक्रमच्या यशस्वी बोलीदारांना वित्तपुरवठा करण्यासाठी असलेले बँकांचे प्रस्ताव त्यांच्या संचालक मंडळांद्वारा मंजुर झालेले असावेत
- बँकेने दिलेले अर्थसहाय्य हे, भारत सरकारने मंजुर दिलेल्या निर्गुंतवणुक कार्यक्रमाखाली पीएसयुचे शेअर्स मिळविण्यासाठी (लागु असेल तेथे द्वितीय टप्प्यातील वैधानिक मुक्त ऑफरसह) दिलेले असावे परंतु केवळ त्या पीएसयुचे शेअर्सच मिळविण्यासाठी नसावे. भारत सरकारच्या प्रायोजित (प्रॉस्पेक्टिव) निर्गुंतवणुकीसाठीच बँकेचे अर्थसहाय्य उपलब्ध केले जावे.

- ज्यांना बँकेचे अर्थसहाय्य द्यावयाचे आहे अशा कंपन्या व प्रायोजक ह्यांच्याकडे सुयोग्य/पुरेसे निव्वळ मूल्य तसेच बँकिंग प्रणालीकडून त्यांनी घेतलेल्या कर्जांची नियमित परतफेड केली असल्याचा उत्तम पूर्वतिहास असावा.
- अशा प्रकारे बँकेने दिलेले अर्थसहाय्य हे त्या बँकेचा आकार/आवाका, तिचे निव्वळ मूल्य व व्यवहार आणि तिच्या रिक्स प्रोफाइल ह्यांना सुसंगत असे असावे.

२.३.१८.२ अशा पीएसयु निर्गुंतवणुकीविरुध्द दिलेल्या अग्रिम राशी, त्या निर्गुंतवणुक झालेल्या पीएसयुच्या शेअर्सनी किंवा अन्य कोणत्याह शेअर्सने प्रतिभूतित केलेल्या असल्यास, बँकांनी, आरबीआयद्वारा पुढील बाबतीत दिलेल्या विद्यमान मार्गदर्शक तत्वांचे अनुसरण करावे -- मार्जिनवरील भांडवली बाजार जोखमी, भांडवल बाजारवरील सर्वसमावेशक जोखीम मर्यादा, जोखीम व्यवस्थापन आणि अंतर्गत नियंत्रण प्रणाली, मंडळाच्या ऑडिट कमिटीची दक्षता व देखरेख, मूल्यांकन व प्रकटीकरण इत्यादि (तुलना करा -- आरबीआयचे परिपत्रक क्र. बीपी.बीसी. ११९/२१.०४.१३७/२०००-०१ दि. मे ११, २००१)

२.३.१८.३ <u>शेअर्ससाठी लॉक-इन कालावधीची अट</u>

१) पीएसयु निर्गुंतवणुक कार्यक्रमात भाग घेणाऱ्या कर्जदारांना अर्थसहाय्य करण्याचे ठरविताना बँकांनी अशा कर्जदारांना, ते पुढील गोष्टी करतील याबाबत करारनामा करण्यास सांगावेः-
अ) पीएसयु निर्गुंतवणुक कार्यक्रमाखाली मिळविलेल्या शेअर्सच्या लॉक-इन कालावधीमध्ये, त्या शेअर्सची वासलात करण्यासाठी सरकारकडील लेटर ऑफ वेव्हर सादर करणे.
ब) कर्जदाराकडून मार्जिनच्या आवश्यकतेमध्ये कमी पडल्यास किंवा कसुरी झाल्यास, ते शेअर्स लॉक-इन कालावधीतच विकण्यासाठी (लिक्विडेट) वचनदात्याला (प्लेजी) परवानगी देण्याबाबत सरकारबरोबर केलेल्या कागदपत्रात विशिष्ट/खास तरतुद समाविष्ट करणे.

२) पुढील अटींची पूर्तता केलेली असल्यास, यशस्वी बोलीदाराने, निर्गुंतवणुक झालेल्या कंपनीचे, मिळविलेले/मिळवावयाचे शेअर्स लॉक इन कालात/त्या शेअर्सच्या लिक्विडिटीवर परिणाम करणाऱ्या निर्बंधातही, बँका यशस्वी बोलीदाराला अर्थसहाय्य करु शकतातः-
अ) भारत सरकार व तो यशस्वी बोलीदार ह्यामधील कागदपत्रात अशी विशिष्ट तरतुद असावी की, अशा निर्गुंतवणुकी संबंधाने, व कर्जदाराकडून मार्जिन कमी पडल्यास किंवा कसुरी झाल्यास, त्या वचनदाराला ते शेअर्स लॉक इन कालात असल्यासही ते विकण्याची परवानगी असेल.
ब) त्या कागदपत्रात अशी विशिष्ट तरतुद नसल्यास, त्या कर्जदाराने (यशस्वी बोलीदाराने) त्या पीएसयु निर्गुंतवणुक कार्यक्रमाखाली मिळविलेले शेअर्स विकण्याबाबत/वासलातीबाबत सरकारकडून वेव्हर पत्र मिळवावे.

२.३.१८.४ भारत सरकारद्वारा केल्या जाणाऱ्या पीएसयु निर्गुंतवणुकीच्या अटी व शर्तीनुसार, त्या लॉक इन कालावधीच्या प्रथम वर्षात, प्लेजी बँकेला ते प्लेज (तारण/वचन) आवाहित करण्याची परवानगी नाही. त्या लॉक इन कालावधीच्या दुसऱ्या व तिसऱ्या वर्षात मात्र, अतिरिक्त प्रतिभूती म्हणून किंवा, बँक व कर्जदार ह्यांच्या दरम्यान ठरविलेल्या वेळापत्रकानुसार परतफेड न केली गेल्यास तो कर्जदार विहित मार्जिन भरण्याबाबत असमर्थ ठरल्यास मात्र ते प्लेज आवाहित करण्याचा अधिकार त्या बँकेला आहे. लॉक इन कालावधीच्या दुसऱ्या व तिसऱ्या वर्षात प्लेज आवाहित करण्याचा प्लेजी बँकेचा हक्क हा, सरकार व यशस्वी बोलीदार ह्यांच्यामधील केलेल्या

कागदपत्रांच्या अटी व शर्तीवर अवलंबून असेल. व त्यामुळे प्लेजी बँकेवर काही जबाबदाऱ्या टाकल्या जाण्याची शक्यताहि आहे.

२.३.१८.५ येथे स्पष्ट करण्यात येत की, संबंधित बँकेने सुयोग्य असे मूल्यामापन करावे आणि कर्जदाराला कर्ज देण्याबाबत योग्य ती सावधानता आणि त्या प्रस्तावाची सफलक्षमतेबाबत खात्री करुन घ्यावी. बँकेने ह्याबाबतही समाधान करुन घ्यावे की, बँकेकडे प्लेज केलेल्या शेअर्सच्या वासलातीबाबतचे प्रास्ताविक कागदपत्र हे बँकेला पूर्णपणे स्वीकार्य आहेत व त्यामुळे बँकेवर अवांछित जबाबदाऱ्या येणार नाहीत.

२.३.१८.६ आयईसीडी परिपत्रक क्र. १०/०८.१२.०१/२०००-२००१ दि. ८ जानेवारी २००१ अनुसार, इतर कंपन्यांमधील एनबीएफसींच्या गुंतवणुकीसाठी वित्तपुरवठा करण्यास तसेच आंतर कॉर्पोरेटद्वारे इतर कंपन्यास कर्जे देण्यास/ त्यात ठेवी ठेवण्यास बँकांना पायबंद घालण्यात आला आहे. ह्या परिस्थितीचे पुनरावलोकन करण्यात आले असून बँकांना सांगण्यात आले आहे की, पुढील अटींची पूर्तता करण्याऱ्या एसपीव्हींना गुंतवणुकदार कंपन्या म्हणून समजले जाणार नाही व त्यामुळे त्यांना एनबीएफसी अमजले जाणार नाहीः-
अ) त्यांच्या एकूण ॲसेट्सच्या ९० टक्कयांपेक्षा कमी नसलेले ॲसेट्स, ओनरशिप स्टेक धारण करण्याच्या हेतूने गुंतवणुक म्हणून धारण करणाऱ्या होल्डिंग कंपनीज, स्पेशल परपज व्हेईकल्स म्हणून त्या काम करतात.
ब) ब्लॉक सेल सोडल्यास त्या ह्या सिक्युरिटीजमध्ये व्यापार करत नाहीत.
क) त्या अन्य कोणतीही अन्य आर्थिक कार्यकृती करत नाहीत. आणि --
ड) त्या सार्वजनिक ठेवी स्वीकारत/धारण करत नाहीत.

२.३.१८.७ वरील अटींची पूर्तता करणाऱ्या एसव्हीसी, भारत सरकारच्या पीएसयु निर्गुंतवणुकीसाठी बँकेचे अर्थसहाय्य मिळविण्यास पात्र असतील.

२.३.१८.८ ह्या संदर्भात, येथे निर्दिष्ट करण्यात येत आहे की, भारत सरकारच्या वित्तमंत्रालयाच्या (डीईए), गुंतवणुक विभागाने, जुलै ८, २००२ च्या, युरो इश्युजसाठी असलेल्या मार्गदर्शक तत्वंमध्ये दिल्यानुसार, एडीआर/जीडीआर/ईसीबीच्या उत्पन्नाचा उपयोग करणाऱ्या भारतीय कंपनीला, भारत सरकारच्या निर्गुंतवणुक कार्यक्रमासाठी तसेच नंतरच्या ओपन ऑफरसाठी अर्थसहाय्य करण्याची परवानगी देण्यात आली आहे ह्यासाठी, अशा एडीआर/जीडीआर/ईसीबी इश्युजच्या उत्पन्नाचा वापर, पीएसयु निर्गुंतवणुक कार्यक्रमाला अर्थसहाय्य देण्याचा विचार बँका करु शकतात.

**२.३.१९ किसान विकासपत्रे(केव्हीपी) घेण्यासाठी कर्जे देणे.**

१) अशा काही घटना नजरेस आल्या आहेत की जेथे बँकांनी किसान विकास पत्रे (केव्हीपी) घेण्यासाठी व्यक्तिशः (जास्त करुन श्रीमंत व्यक्तींना - एचएनआय) कर्जे दिलेली आहेत. ह्या एचएनआयनी, मार्जिन म्हणून, आधी केव्हीपीमधील प्रायोजित गुंतवणुकीच्या दर्शनी मूल्याच्या १०% रक्क आणणे आवश्यक होते उरलेली ९० % गुंतवणुक कर्ज म्हणून समजली जाणार होती ती रक्कम ती केव्हीपी मिळविण्यासाठी बँकेकडून दिली जाणार होती. कर्जदाराच्या नावे केव्हीपी मिळाल्याबरोबर ती बँकेकडे गहाण टाकण्यात आली.

२) वरील प्रकारे केलेली कर्ज मंजुरी लघुबचत योजनांच्या उद्दिष्टानुसार नाही. लघु बचत योजनांचा मूळ उद्देश, छोट्या बचती करणारांना बचतीचा एक सुरक्षित मार्ग उपलब्ध करुन

देऊन बचतीला प्रोत्साहन देणे व त्याचबरोबर लोकांना काटकसरीची सवय लावणे हा आहे. केव्हीपी मिळविण्यासाठी/गुंतवणुक करण्यासाठी कर्जे दिल्याने नवीन बचतींना प्रोत्साहन मिळत नाही, तर विद्यमान बचती बँक ठेवींच्या स्वरुपात व छोट्या बचत संलेखामध्ये गुंतून पडतात आणि त्यामुळे अशा योजनांचा मूळ उद्देशच दूर सारला जातो. ह्यासाठी बँकांनी खात्री करुन घ्यावी की किसान विकासपत्रांसह लघु बचत संलेख मिळविण्यासाठी/गुंतवणुक करण्यासाठी कर्जे दिली जाणार नाहीत.

## २.३.२० ७% बचत रोखे २००२, ६.५% बचत रोखे २००३ (अ करपात्र) आणि ८% बचत (करपात्र) रोखे २००३ - गहाणवट सुविधा

भारत सरकारने ठरविले आहे की, अनुसूचित बँकांकडून कर्ज मिळविण्यासाठी, वर दिलेल्या योजनांखाली दिलेल्या बॉड्सचे गहाणवट/तारण किंवा लिएन करण्यास परवानगी दिली जावी. त्यानुसार, वरील बॉड्स धारकांना सरकारी सिक्युरिटीज अधिनियम, २००६ (दि जीएस ॲक्ट) चे कलम २८ आणि सरकारी सिक्युरिटीज विनियम, २००७ (दि जीएस रेग्युलेशन्स) चे विनियम २१ व २२ ह्यानुसार, अधिसूचित बँकांच्या नावे हे बॉड्स गहाण/तारण/लिएन म्हणून ठेवण्याचा हक्क आहे. आरबीआय परिपत्रक डीबीओडी.क्र.डीआयआर.बीसी.६६/१३.०३.००/२००८-०९ दि. ऑक्टोंबर, २४, २००८ सोबत, ७% बॉड्ससाठी अधिसूचिना क्र. एफ-४(१३)-डबल्यु अँड एम/२००२ दि. १९.८.२००८, ६.५ % बचत बॉड्ससाठी अधिसूचना एफ-४(९)-डबल्यु अँड एम/२००३ दि. ऑगस्ट १९, २००८ आणि ८ % बचत बॉड्ससाठी, अधिसूचना एफ-४(१०)-डबल्यु अँड एम/२००३ दि. १९, २००८च्या सुधारित अधिसूचनांची एक-एक प्रत जोडण्यात आली आहे. वरील सुधारणांच्या दृष्टिकोनातून बँकांना सांगण्यात येते की त्यांनी दि जीएस ॲक्टचे कलम २८ आणि दि जीएस रेग्युलेशन्स चे विनियम २१ व २२ ह्यामध्ये विहित केलेल्या कार्यरीतीनुसार तारण, किंवा गहाणवट किंवा लिएन द्वारा गहाणवट सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. संदर्भासाठी, वरील परिपत्रकात, वरील अधिनियम/विनियम ह्यामधील संबंधित उतारे, फॉर्म्स आणि भारत सरकारने दिलेले वृत्तपत्र वितरण दिलेले आहे येथे नोंद घ्यावी की अशी गहाणवट सुविधा केवळ वरील बॉडधारकांसाठीच असून **तृतीय पक्षांना दिलेल्या कर्जासाठी ती उपलब्ध नाही.**

## २.३.२१ अकार्य ॲसेट्सची तडजोड वरील मार्गदर्शक तत्वे - कोर्टाकडून कन्सेंट डिक्री मिळविणे.

एर्नाकुलमच्या डेट रिकव्हरी ट्रायब्युनलला एका प्रकरणात आढळून आले की, कॉंप्रमाईज सेटलमेंट योजनाखाली बँक व प्रतिवादी कर्जदार ह्यांच्या दरम्यान तडजोड झाली असूनही, बँकेने डीआरटीकडून कन्सेंट डिक्री तर मिळविलीच नव्हती पण तडजोड झाल्याचे सत्याही अडीच वर्षापेक्षा जास्त काळासाठी उघड केले नव्हते. ह्यामुळे आरबीआयच्या मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन झाले होते आणि ट्रायब्युनलचा वेळही फुकट गेला होता. ह्यासाठी बँकांना सांगण्यात येते की, एखादे कोर्ट/डीआरटी/बीआयएफआर ह्यामध्ये एखादी बाब दाखल केली गेल्यावर, कर्जदाराबरोबर केलेल्या तडजोडीबाबत ते कोर्ट/डीआरटी/बीआयएफआर ह्यांचेकडून त्यांनी कन्सेंट डिक्री मिळविणे आवश्यक आहे.

## २.३.२२ बँकांना प्रोजेक्ट फायनान्स पोर्ट फोलियो

२.३.२२.१ प्रकल्पांना अर्थसहाय्य करतेवेळी, प्रायोजकांच्या इक्विटीचा स्तर ठरविण्यासाठी बँका पुढीलपैकी एक रीत अवलंबितात -

१. बँकेने तिच्या वचनानुसार वाटप सुरु करण्यापूर्वीच, प्रायोजक त्यांचे संपूर्ण कॉंट्रिब्युशन अपफ्रंट आणतात.
२. प्रायोजक त्यांच्या इक्विटीची विशिष्ट टक्केवारी (४०% - ५०%) अपफ्रंट आणतात आणि उर्वरित रक्कम टप्प्या-टप्प्याने दिली जाते.
३. प्रायोजक सुरुवातीपासूनच राजी असतात की, बँका कर्जाचा भाग ज्या प्रमाणात देतील त्याच प्रमाणात ते इक्विटीची रक्कम आणतील.

२.३.२२.२ असे निर्णाय बँकेच्या संचालक मंडळाद्वारे घेतेले जातात हे जरी स्तुत्य असले तरी असे दिसून आले आहे की, ह्यातील शेवटच्या रीतीमध्ये इक्विटी फंडिंगची जोखीम अधिकतर आहे व बँकांना त्यांच्याच हितासाठी सांगण्यात येते की, त्यांनी डेट इक्विटी रेशो (डीईआर) बाबत स्पष्ट धोरण ठेवावे आणि प्रायोजकांनी इक्विटी/निधी देणे हे असे ठेवण्यात यावे की वैधानिक असा डीईआर सर्वकाळ ठेवला जाईल. ह्याशिवाय बँका त्यांचे निधी देण्याचे क्रम ठरवून बँकांद्वारेच इक्विटीसाठी निधी दिला जाण्याची शक्यता टाळू शकतात.

**२.३.२३ सरकारकडून येणे असलेल्या रकमे विरुध्द ब्रिज लोन्स**

केंद्र/राज्य सरकारांकडून, सबसिडी, परतावे, भरपाई, भांडवली निधी इत्यादींच्या स्वरुपात येणे असलेल्या रकमांवर बँकांनी ब्रिज लोन्स देऊ नयेत. तथापि ह्यात पुढील अपवाद करण्यात आले आहेत :-

अ) खत उद्योगाच्या बाबत, नेहमीच्या रिटेंशन प्राईज स्कीमखाली, (आरपीएस) ६० दिवसांपर्यंत बँका मिळणाऱ्या सबसिडीविरुध्द बँका अर्थसहाय्य करु शकतात. येथे स्पष्ट करण्यात येते की, ही सुविधा केवळ एक तात्पुरता उपाय म्हणूनच देण्यास परवानगी देण्यात आली असून खत कंपन्यांनी त्यांची आर्थिक परिस्थिती हळू हळू सुधारावी की जेणे करुन त्यांना सबसिडीविरुध्द बँकेकडून मिळाणाऱ्या अर्थसहाय्यावर अवलंबून रहावे लागू नये. इनपुट वस्तूंची किंमत, नेआणीचा खर्च इत्यादीमध्ये झालेली वाढ ह्यामुळे रिटेन्शन प्राईसमधील अपेक्षित सुधारणेवर आधारित एककांनी केलेले दावे ह्यासह अन्य कोणत्याही सबसिडींबाबत बँकांनी अर्थसहाय्य करु नये.

ब) विद्यमान निदेशांखाली दिलेल्या सूचनांपर्यंत, निर्यातदारांना सरकारकडून येणे असलेल्या रकमांवर (उदा. ड्युटी ड्रॉ बॅक व आयपीआरएस) अर्थसहाय्य करणे बँका सुरु ठेवू शकतात.

**२.४ धनकोंसाठी असलेल्या उचित व्यवहार संहितेवरील मार्गदर्शक तत्वे**

२.४.१ भारत सरकारने तयार केलेल्या, लेंडर्स लायाबिलीटी लॉजवरील कार्यकारी गटाच्या शिफारशींच्या, आधारावर सरकार, निवडक बँका व वित्तसंस्था ह्यांच्याशी सल्लामसलत करुन धनकोंसाठी उचित व्यवहार संहिता सुरु करण्याबाबतची शक्यता तपासून पाहण्यात आली. ही मार्गदर्शक तत्वे आता निश्चित करण्या आली असून, बँका/अखिल भारतातील वित्तसंस्थांना ह्यांना सांगण्यात येते की त्यांनी पुढील मार्गदर्शक तत्वांचे अनिसरण करावे आणि त्यांच्या संचालक मंडळाच्या मंजुरीने उचित व्यवहार संहिता तयार करावी.

२.४.२ मार्गदर्शक तत्वे

१) कर्जासाठी आलेले अर्ज व त्यावरील प्रक्रिया.

अ) कर्जदाराने मागितलेल्या कर्जाची रक्कम कितीही असली तरी, सर्व प्रकारच्या कर्जांबाबतचे अर्जाचे फॉर्म्स सर्वसमावेशक असावेत. त्यात पुढील माहितीचा समावेश असावा -- प्रक्रिया करण्यासाठी देय असलेली शुल्के/आकार, अर्ज स्वीकारला व गेल्यास अशा शुल्कांची परत

दिली जाणारी रक्कम, पूर्व प्रदानाचे पर्याय व कर्जदाराच्या हितसंबंधास बाधा येऊ शकेल अशी अन्य बाब. ह्यामुळे इतर बँकांबरोबर तुलना करता येऊन कर्जदाराला सज्ञान निर्णय घेता येईल.

आमच्या नजरेस आले आहे की, काही बँका, प्रक्रिया शुल्काव्यतिरिक्त काही विशिष्ट आकार लावतात आणि त्याबाबत कर्जदाराला सुरुवातीस काहीच सांगितलेले नसते. येथे सांगण्यात येत आहे की, कर्जदाराला पूर्वकल्पना न देता असा आकार लावणे ही अयोग्य/अनुचित कार्यरीत आहे.

बँक/वित्तसंस्था ह्यांनी खात्री करुन घ्यावी की, प्रक्रियेसंबंधाने लागणारी शुल्के/आकार ह्याबाबतची माहिती अर्जाच्या फॉर्ममध्ये न चुकता समाविष्ट करण्यात आली आहे. ह्याशिवाय, बँकांनी त्यांच्या अशा ग्राहकांना एकूण खर्च कळविलाच पाहिजे, जेणे करुन ते इतर स्त्रोतांचे दर व आकारांबरोबर तुलना करु शकतील.

ब) बँका व वित्तसंस्थांनी, कर्जाचे फॉर्म्स मिळाल्याबाबत पोचपावती देण्याची एक प्रणाली तयार करावी. अशा पोचपावत्यांमध्ये, रु २ लाख पर्यंतच्या कर्जांचे वाटप किती कालावधीमध्ये केले जाईल ह्याची कालमर्यादाही अर्जाच्या फॉर्ममध्ये दिली जावी.

क) बँका/वित्तसंस्थांनी कर्जाच्या अर्जांची पडताळणी वाजती कालावधीमध्ये करावी. अतिरिक्त माहिती/कागदपत्रे देणे आवश्यक असल्यास त्यांनी कर्जदारांना त्वरित कळवावे.

ड) कर्जाच्या सर्व प्रकारांबाबत, थ्रेशहोल्ड मर्यादा कितीही असली तरी व क्रेडिट कार्डासाठीच्या अर्जासह, धनकोंनी ते अर्ज बँकेच्या मते का फेटाळण्यात आले त्याची कारणे वैधानिक कालावधीत लेखी स्वरुपात कळवावीत.

२) <u>कर्जाचे मूल्यमापन व अटी व शर्ती</u>

अ) धनकोंनी खात्री करुन घ्यावी की, कर्जदारांनी केलेल्या अर्जाचे योग्य असे मूल्यमापन केले जाईल. कर्जदाराची कर्ज - क्षमता जाणण्यासाठी परिश्रम घेण्याच्या बदल्यात, मार्जिन व प्रतिभूती ह्यावर त्यांनी अवलंबून राहू नये.

ब) धनकोंनी कर्जदाराला, कर्ज मर्यादा व त्याबाबतच्या अटी व शर्ती कळवाव्यात आणि कर्जदाराने दिलेले त्याबाबतचे स्वीकारपत्र, त्याला त्याची जाणीव देऊन रेकॉर्डमध्ये ठेवावे.

क) बँका/वित्तसंस्थांनी दिलेल्या कर्जसुविधांबाबतच्या धनको व कर्जदार यांच्या संमतीने ठरविलेल्या अटी व शर्ती व इतर कायदेशीर बाबी लिखित स्वरुपात व प्राधिकृत अधिकाऱ्याने प्रमाणित केलेल्या असाव्यात. कर्ज कराराची एक प्रत, तसेच त्या करारासोबत जोडलेल्या कागदपत्रांची एक प्रत कर्जदाराला देण्यात यावी. येथे पुनश्च सांगण्यात येते की, कर्जांची मंजुरी/वाटप करतेवेळी, बँकांनी चुकता, कर्जकराराची एक प्रत व त्या करारात निर्दिष्ट केलेल्या व सोबत जोडलेल्या कागदपत्रांची एक प्रत कर्जदाराला द्यावी.

ड) कर्ज करारात शक्यतो, धनको देऊ शकतात अशा कर्जसुविधांचा स्पष्ट निर्देश केला असावा. ह्यात पुढील गोष्टींचा समावेश असू शकतो - मंजुर केलेल्या मर्यादेबाहेरील निकासी बाबत मंजुरी किंवा मनाई, कर्ज मंजुरी करतेवेळी विशिष्ट कारणासाठी असलेल्या चेक्सशिवाय अन्य

हेतूंनी दिलेले चेक्स वटविणे, अकार्यकारी ठरविलेल्या खात्यामधून, किंवा मंजुरीच्या अटी न पाळल्याने कर्ज खात्यामधून निकासी करण्यास मनाई, हे देखील स्पष्ट करण्यात यावे की, कर्जदाराच्या उद्योग धंद्यात वाढ झाल्याकारणाने, त्याच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यास, कर्ज मर्यादेचे योग्य ते पुनरावलोकन केल्याशिवाय, बांधील नाही.

ई) बहुबँकीय (कन्सोर्टियम) कर्जाबाबत, त्यातील सहभागी धनकोंनी, सर्व प्रस्तावांचे मूल्यमापन शक्यतो ठरलेल्या काळावधीतच पूर्ण करण्यासाठी कार्यरीती तयार कराव्यात आणि वाजवी कालावधीत अर्थसहाय्य करण्या किंवा न करण्याबाबतचा त्यांचा निर्णाय कळवावा.

३) <u>अटी व शर्तींमधील बदलांसह कर्जांचे वाटप</u>
धनकोंनी, मंजुर केलेल्या कर्जांचे वाटप, अशा मंजुरीबाबत असलेल्या अटी व शर्तींनुसार वेळेवर करावे. व्याजदर, सेवा आकार इत्यादींसह, अटी व शर्तींमध्ये बदल झाल्यास, धनकोंनी त्याबाबत पूर्वसूचना द्यावी. धनकोंनी खात्री करुन घ्यावी की व्याजदर व आकार ह्यातील बदलांची अंमलबजावणी, भविष्यकाळातच केली जाईल.

४) <u>वाटप केल्यानंतरचे पर्यवेक्षण</u>
अ) धनकोंद्वारा, विशेषतः रु २ लाख पर्यंतच्या कर्जाबाबतचे वाटपोत्तर पर्यवेक्षण हे, कर्जदाराला येऊ शकणाऱ्या “कोणत्याही धनकोसंबंधित” खऱ्या अडचणी निवारण्यासाठी विधायक असे असावे.

ब) करारनाम्याखाली कर्ज आवाहित/प्रदान किंवा कामगिरी लवकर करणे ह्याबाबतचा किंवा अतिरिक्त प्रतिभूती घेण्याबाबतचा निर्णय घेण्यापूर्वी, धनकोंनी, कर्ज - करारनाम्यात विहित केल्याप्रमाणे कर्जदाराला पूर्वसूचना द्यावी किंवा त्या करारनाम्यात अशी अट नसल्यास वाजवी वेळ द्यावा.

क) कर्जाची परतफेड झाल्यावर किंवा वसुली झाल्यावर धनकोंनी सर्व प्रतिभूती मुक्त कराव्यात. मात्र तेव्हा, धनकोंचा कर्जदाराबाबत असलेल्या हक्कांसाठी कोणताही दावा/लिएन असू नये. सेट ऑफ कराव्याचा अशा हक्काची अंमलबजावणी केली गेल्यास, कर्जदारांना, संबंधित दाव्याची तडजोड/प्रदान होईपर्यंत, शिल्लक हक्कांबाबतची सविस्तार कागदपत्रे व धनकोना ज्या कागदपत्रांखाली प्रतिभूती ठेवून घेण्याचा अधिकार आहे, त्या कागदपत्रांसह त्याबाबतची नोटिस दिली जावी.

५) <u>सर्वसाधारण</u>
अ) कर्ज मंजुरीच्या कागदपत्रात असलेल्या अटी व शर्ती सोडल्यास (कर्जदाराने आधी प्रकट न केलेली नवीन माहिती धनकोच्या नजरेस आल्याशिवाय) धनकोंनी कर्जदारांच्या व्यवहारांमध्ये ढवळाढवळ करु नये.
ब) कर्ज देतेवेळी धनकोंनी कर्जदारांचे लिंग, जात - पात व धर्म ह्याबाबत भेदभाव करु नये. तथापि, समाजाच्या दुर्बल घटकांसाठी असलेल्या कर्ज-संबंधित योजनांमध्ये भाग घेण्यास धनकोंना मज्जाव नाही.
क) कर्जांची वसुली करण्याबाबत धनकोंनी अवास्तव त्रास देण्याच्या रीतींचा अवलंब करु नये. उदा. वेळी-अवेळी कर्जदारांना तगादा लावणे, कर्ज वसुलीसाठी शारिरिक बळाचा वापर करणे इत्यादि.

ड) कर्ज खात्याच्या हस्तांतरणाबाबत, कर्जदाराकडून किंवा एखाद्या बँके/वित्तसंस्थेकडून, त्या खात्याचाताबा घेण्याबाबत विनंती केली गेल्यास, त्याबाबतची संमती किंवा अन्यथा, म्हणजे, धनकोची हरकत असल्यास, त्याबाबत अशी विनंती मिळाल्याच्या तारखेपासून २१ दिवसांच्यात आत कळविली जावी.

२.४.३ वरील परिच्छेद २.४.२ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्वांवरील उचित व्यवहार संहिता, सर्व प्रकारच्या कर्जांसाठी अनुसरली जावी. बँका व वित्तसंस्थांना त्यांची स्वतःची उचित व्यवहार संहिता तयार करावयाचे स्वातंत्र्य आहे. परंतु त्यात ह्या मार्गदर्शक तत्वांची व्याप्ती वाढविलेली असावी पण त्यातील मूळ उद्देशाला धक्का लावल जाऊ नये. ह्यासाठी बँका व वित्तसंस्थांच्या संचालक मंडळांनी स्पष्ट धोरण तयार करावे.

२.४.४ ह्याबाबतीत निर्माण होणाऱ्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी संचालक मंडळानी, त्यांच्या संस्थेत, सुयोग्य अशी तक्रार निवारण यंत्रणा तयार करावी. अशा यंत्रणेने खात्री करुन घ्यावी की, कर्ज देणाऱ्या संस्थांच्या कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्णयामुळे निर्माण झालेल्या सर्व तक्रारी/दाव्यांची सुनावणी होऊन ते किमान पुढील स्तरावर सोडविले जातील. संचालक मंडळांनी, उचित व्यवहार संहितेचे पालन होण्याबाबत, तसेच नियंत्रक कार्यालयांमधील निरनिराळ्या स्तरांवरील तक्रार निवारण कक्षांचे कामकाज पुनरावलोकन करण्याची व्यवस्था करावी. अशा पुनरावलोकनांचा एकत्रित केलेला अहवाल संचालक मंडळाकडे नियमित कालावधीने विहित केल्यानुसार पाठविला जावा.

२.४.५ ह्या संहितेचा स्वीकार, आवश्यक त्यानुसार कर्ज-अर्जांच्या फॉर्म्सची छपाई आणि त्यांचे निरनिराळ्या शाखा व नियंत्रक कार्यालयांमध्ये वाटप करणे पूर्ण केले जावे. बँका व वित्तसंस्थांनी स्वीकारलेल्या उचित व्यवहार संहिता वेबसाईटवरही प्रदर्शित केल्या जाव्यात व त्यांना चांगली प्रसिध्दी दिली जावी. त्याची एक प्रत भारतीय रिझर्व बँकेकडेही पाठविल जावी.

**नियंत्रित पदार्थांची यादी** **जोडपत्र १**

**(परिच्छेद २.२.३.१)**

| ग्रुप | **पदार्थ** | **ओझोन घटविण्याचे सामर्थ्य** |
|---|---|---|
| ग्रुप १ | | |
| सीएफ सीआय$_{३}$ | (सीएफसी -११) | १.० |
| सी$_{२}$<br>एफ$_{३}$सीआय$_{३}$ | (सीएफसी -१२) | १.० |
| सी$_{२}$एफ$_{३}$सीआय$_{३}$ | (सीएफसी -११३) | ०.८ |
| सी$_{२}$<br>एफ$_{३}$सीआय$_{३}$ | (सीएफसी -११४) | १.० |
| सीआय | (सीएफसी -११५) | ०.६ |
| ग्रुप २ | | |
| सीएफ $_{२}$बीआरसीआय | (हेलोन-१२११) | ३.० |
| सीएफ $_{३}$बीआर | (हेलोन-१३०१) | १०.० |
| सी$_{२}$एफ$_{४}$बीआर$_{२}$ | (हेलोन-२४०२) | ६.० |
| । ओझोन कमी करणारी सामर्थ्ये (पोटेंशियल्स) माहित असलेल्या ज्ञानाच्या आधारावर मोजली जातात आणि त्यांचे पुनरावलोकन करुन ती सुधारित केली जातात. | | |

**नियंत्रित पदार्थांची यादी** **जोडपत्र २**

**(परिच्छेद २.२.३.१)**

| **ग्रुप** | **पदार्थ** | **ओझोन घटविण्याचे सामर्थ्य** |
|---|---|---|
| ग्रुप १ | | |
| सीएफसी $_{३}$ सीआय | (सीएफसीसी -१३) | १.० |
| सीएफसी $_{२}$ सीआय $_{५}$ | (सीएफसी -१११) | १.० |
| सी$_{२}$ एफ $_{२}$ सीआय $_{४}$ | (सीएफसी -११२) | १.० |
| सी$_{२}$एफ सीआय $_{७}$ | (सीएफसी -२११) | १.० |
| सी$_{२}$एफ$_{२}$ सीआय ६ | (सीएफसी -२१२) | १.० |
| सी$_{३}$एफ$_{३}$ सीआय $_{५}$ | (सीएफसी -२१३) | १.० |
| सी$_{३}$एफ$_{४}$ सीआय $_{४}$ | (सीएफसी -२१४) | १.० |
| सी$_{३}$एफ$_{५}$ सीआय $_{३}$ | (सीएफसी -२१५) | १.० |
| सी$_{३}$एफ$_{६}$ सीआय $_{२}$ | (सीएफसी -२१६) | १.० |
| सी$_{३}$एफ$_{७}$ सीआय | (सीएफसी -२१७) | १.० |
| ग्रुप २ | | |
| सी सीआय $_{४}$ | कार्बन टेट्राक्लोराईड | १.१ |
| ग्रुप ३ | | |
| सी$_{२}$एच$_{३}$ सीआय$_{३}$ * | १,१,१ - ट्रिक्लोरोइथेन (मिथिल क्लोरोफॉर्म) | ०.१ |
| * हा फॉर्म्युला १,१,२ यांच्याशी संबंधित नाही - ट्रायक्लोरोइथेन | | |

**जोडपत्र ३**

**सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोल**
**इतर कार्यकारी अटी**
**(परिच्छेद २.२.४.४(४))**

१) सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोलखाली असलेल्या मालांचा व्यापार करणाऱ्या ग्राहकांना, बँकांनी, ह्या निदेशाच्या हेतूशी प्रत्यक्षकिंवा अप्रत्यक्षपणे विपरित असलेल्या कर्ज सुविधा देऊ करु नयेत. अशा कर्जदारांना पुस्तकी कर्जे/येणे रक्कमा आणि एलआयसी पॉलिसी, शेअर्स व स्टॉक्स आणि रियल इस्टेट ह्याविरुध्द अग्रिम राशी दिल्या जाऊ नयेत.

२) सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोलखालील माल पुढे जाईल त्याप्रमाणे काढलेल्या डिमांड डॉक्युमेंटरी बिलांवर किंवा त्यांच्या खरेदीवर जरी अग्रिम राशी देण्यस सूट असली तरी, संबंधित इनव्हॉईसेस व त्याबरोबर वाहतुकदारांना दिलेल्या त्याबाबतच्या पावत्या ह्यांची पडताळणी करुन, बँकांनी खात्री करुन घ्यावी की, सादर केलेली बिले ही त्या मालाच्या प्रत्यक्ष हालचाली केल्यामुळेच निर्माण झाली आहेत.

३) सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोलखाली असलेल्या मालाच्या विक्रीमुळे निर्माण झालेली युजन्स बिले ही, दिलेल्या निदेशांमधील विशिष्ट परवानगी दिल्याचे सोडल्यास डिस्काउंट केली जाऊ नयेत.

४) ह्या निदेशांमध्ये विहित केलेल्या काही अटीपर्यंतच क्लीन टेलिग्राफिक खरेदी सुविधा देण्याची परवानगी आहे.

५) प्राधान्य क्षेत्राला विहित केलेल्या अग्रिम राशीही सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोल निदेशाखाली येतात.

६) एकापेक्षा अधिक प्रकारच्या मालाच्या विरुध्द दिलेल्या सिक्युरिटी विरुध्द आणि/किंवा इतर प्रकारच्या सिक्युरिटीविरुध्द, जेथे कर्जमर्यादा मंजुर केल्या गेल्या आहेत तेथे, प्रत्येक मालाविरुध्द दिलेल्या कर्ज मर्यादा वेगवेगळ्या केल्या जाव्यात आणि वेगळ्या केलेल्या प्रत्येक मर्यादेला ह्या निदेशातील निर्बंध लागु करण्यात यावेत.

७) सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोलखालील मालांचा व्यापार करणाऱ्या कर्जदारांना बँका कर्ज देऊ शकतात. मात्र त्याबाबत दिलेल्या मुदत कर्जाचा उपयोग, संयंत्रे व यंत्रसामुग्री ह्यासारखे ब्लॉक ॲसेट्स घेण्यासाठी केला असला पाहिजे व बँकांनीही नेहमीप्रमाणेच मूल्यमापन व इतर निकष पूर्ण केले असले पाहिजेत.

८) सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोलखालील निदेशाखाली दिलेल्या अग्रिम राशींवरील व्याजदर ठरविण्याचे स्वातंत्र्य बँकांना देण्यात आले आहे.

९) भारतीय रिझर्व बँक, फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया आणि राज्य सरकारे ह्यांना, सेंट्रल पूलसाठी सरकारने ठरविलेल्या दराने अन्नधान्य गोळा करण्यासाठी व सार्वजनिक वितरण प्रणाली (पीडीएस) खाली ते वितरित करण्यासाठी, भारत मर्यादा घालण्यास प्राधिकृत करते.

ह्या मर्यादा कोणत्याही मार्जिनशिवाय प्राधिकृत केल्या असल्याने, क्रेडिट सेल्स, बुक डेट्स सरकारी सबसिडी इत्यादींविरुध्द कर्ज काढता येणार नाही.

१०) आरबीआयने वेळोवेळी दिलेल्या सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोल उपायांवरील निदेशांचा बँकांनी संदर्भ घ्यावा.

**जोडपत्र ४**

**सोने आयात करण्यासाठी नामनिर्देशित केलेल्या बँकांची यादी**
**(परिच्छेद २.३.१२.१)**

| | |
|---|---|
| १. | अलाह  बाद बँक |
| २. | ॲक्सिस बँक लि |
| ३. | बँक ऑफ बरोडा |
| ४. | बँक ऑफ इंडिया |
| ५. | बँक ऑफ नोवा स्कोशिया |
| ६. | कॅनरा बँक |
| ७. | कॉरपोरेशन बँक |
| ८. | फेडरल बँक लि |
| ९. | आयसीआयसीआय बँक लि |
| १०. | इंडियन ओव्हरसीज बँक |
| ११. | इंड्सइंड बँक लि |
| १२. | कोट्क महिं  द्रा बँक लि |

| | |
|---|---|
| १३. | एचडीएफसी बँक लि |
| १४. | इंडियन बँक |
| १५. | ओरिएंट्ल बँक ऑफ कॉमर्स |
| १६. | पंजाब नॅशनल बँक |
| १७. | स्टेट बँक ऑफ इंडिया |
| १८. | सिंडिकेट बँक |
| १९. | युनियन बँक ऑफइंडिया |
| २०. | सेंट्रल बँक ऑफ इंडया |
| २१. | स्टेट बँक ऑफ पटियाला |
| २२. | स्टन्डर्ड चार्टर्ड बँक |
| २३. | आंध्र बँक |

**जोडपत्र ५**

## कर्जे व अग्रिम राशींवरील महापरिपत्रकात
## एकत्रित केलेल्या परिपत्रकांची यादी - वैधानिक व इतर निर्बंध

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डीबीओडी.बीपी. बीसी | ११०/०८.१२.००१/२००८-०९ | १०.०२.२००९ |
| २. | डीबीओडी. बीपी. बीसी | ९४/०८.१२.००१/२००८-०९ | ०८.१२.२००८ |
| ३. | डीबीओडी.एलइजी.क्र बीसी. | ८६/०९.०७.००५/२००८-०९ | २५.११.२००८ |
| ४. | डीबीओडी. डीआयआर. बीसी | ६६/१३.०३.००/२००८-०९ | २४.१०.२००८ |
| ५. | डीबीओडी. बीपी. बीसी | ६५/२१.०६.००१/२००८-०९ | २०.१०.२००८ |
| ६. | डीबीओडी. बीपी. बीसी | ५९/२१.०३.००९/२००८-०९ | १४.१०.२००८ |
| ७. | डीबीओडी. बीपी. बीसी | ४६/०८.१२.००१/२००८-०९ | १९.०९.२००८ |
| ८. | डीबीओडी. बीपी. बीसी | ३०/०८.१२.१४/२००८-०९ | ०६.०८.२००८ |
| ९. | डीबीओडी. डीआयआर. बीसी. | १७/१३.०३.००/२००८-०९ | ०१.०७.२००८ |